cmyk

## संपादकीय

### हेकेखोर मुख्यमंत्र्याचा अखेर राजीनामा !

मणिपूरचे मुख्यमंत्री, माजी फुटबॉलपटू आणि माजी पत्रकार एन. बिरेनसिंह यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा राज्यपालांच्याकडे सोपवला आहे. १४ आमदार आणि भाजप नेते संदीप पात्रा यांच्यासोबत जाऊन त्यांनी राजीनामा सोपवला. याचा अर्थच ते तेव्हाही सहजासहजी खुर्ची सोडायला तयार नसावेत. दिल्लीत बोलवून त्यांना राजीनामा द्यायला सांगितला गेला आणि देतात की नाही हे पाहणीसाठी पात्रा यांना मुराळी म्हणून पाठविले गेले.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड - महाराष्ट्र वर्ष - ४ अंक-२९० बुधवार, दि.१२ फेब्रुवारी २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने- ६ किंमत ३ रूपये

# नाफेडची खरेदी बंद; सोयाबीनचे दर कोसळले

## खरेदीला मुदतवाढ नाहीच, लाखो क्विंटल साठा शिल्लक

**मुंबई । पतिनिधी**

**सोयाबीन खरेदीचा सावळा-गोंधळ अजूनही संपलेला नाही. एकीकडे केंद्र सरकार सोयाबीन खरेदीसाठीची ९० दिवसांची मुदतवाढ पुर्ण झाल्याचे सांगत पाठ थोपटवत आहे. तर दुसरीकडे राज्य पणन महासंघाने शेतकऱ्यांची झोप उडवली आहे. नाफेडने खरेदी बंद केल्याने राज्यात लाखो क्विंटल सोयाबीन शिल्लक असून शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारी खरेदी बंद झाल्याने सोयाबीनचे दर कोसळले असून ३ हजार ५०० प्रति क्विंटलचा शेतकऱ्यांना दर मिळत असल्याचे चित्र आहे.**



सोयाबीन खरेदीचा सावळा गोंधळ अजून संपलेला नाही. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना सरकारने केवळ झुलवत ठेवले आहे. या शेतकऱ्यांच्या तोंडाला पानं पुसल्याचे राज्य पणन महासंघाच्या एका आदेशाने समोर आले आहे. माध्यमांशी बोलताना केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सोयाबीन आणि भुईमुग खरेदीसाठी ९० दिवसांची मुदत वाढ दिल्याचा दावा करत स्वतःची पाठ थोपटून घेतली. तर दुसरीकडे नाफेडच्या खरेदी केंद्रावरील दूरच दूर रांगा त्यांना दिसल्या नाहीत. अजून हजारो शेतकऱ्यांची ◀◀ पान २ वर

### यापूर्वी दोनदा मुदतवाढ

सुरुवातीला बारदाना नसल्याने राज्यातील अनेक जिल्ह्यात सोयाबीन खरेदी रखडली होती. खरेदीची मुदत १२ जानेवारी रोजी संपली होती. केंद्र सरकारने ही मुदत ३१ जानेवारीपर्यंत वाढवली होती. त्यानंतर पुन्हा ही मुदतवाढ देण्यात आली. ती ६ फेब्रुवारीपर्यंत होती. मुदत संपल्यानंतर खरेदीसाठी नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांची नाफेडने सोयाबीन खरेदी केलेली नाही.

### केंद्राने प्रस्तावाला दिला ठेंगा

राज्य सरकारच्या मागणीनुसार केंद्राने सलग दोन वेळा राज्याला सोयाबीन खरेदीची मुदत वाढ दिली. त्यानंतर सोयाबीन खरेदी साठी मुदत वाढीचा प्रस्ताव पणन विभागाने केंद्र सरकारला पाठवला होता. मुदत वाढ मिळेल अशी आशा असतानाच आता मुदत वाढ मिळणार नाही असे पणन खात्याने स्पष्ट केले आहे.

## थोडक्यात...

### ‘आपत्ती व्यवस्थापन’ च्या नियमांत बदल

मुंबई-आपत्ती व्यवस्थापन समितीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा समावेश करण्यासाठी नियमात बदल होणार आहे. मंत्रिमंडळ बैठकीत आपत्ती व्यवस्थापन समितीच्या नियमात बदल केला जाणार आहे. आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा समावेश करण्यात आला आहे. मात्र या समितीतून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना वगळण्यात आले होते. यानंतर महायुतीमध्ये वितुष्ट निर्माण झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगत असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निर्णय फिरवण्याचा विचार केला असून आपत्ती व्यवस्थापन समितीमध्ये वाईल्ड कार्डने एकनाथ शिंदे यांना एन्ट्री देणार असल्याचे समोर येत आहे.

### इंडिया गॉट लेटंटमधील युट्यूबर्सविरुद्ध गुन्हा दाखल

मुंबई-इंडिया गॉट लेटंट शोमधील यूट्यूबर्स विरोधात आसाममध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शोमधील अश्लील कंटेटविरोधात गुन्हा नोंदवल्याची माहिती आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमांनी सोशल मीडियावरील पोस्टमधून दिली आहे. या दोघांसह इतरांना राष्ट्रीय महिला आयोगाने समन्स बजावले आहे. १७ फेब्रुवारी रोजी याप्रकरणी सुनावणी होणार आहे. तसेच राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सुध्दा नोटीस बजावली आहे.

### बीड जिल्ह्यात ३१० शस्त्र परवाने रद्द

बीड- जिल्ह्यात आत्तापर्यंत एकूण ३१० शस्त्र परवाने रद्द करण्यात आले आहे. ज्यात पोलिसांनी प्रस्ताव पाठवलेल्या आणखी १२७ जणांचे शास्त्र प्रमाणे रद्द निलंबित करण्यात आले आहेत. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर अवैध शस्त्र परवानाचा मुद्दा समोर आला होता. त्यानंतर प्रशासनाने ही कारवाई केली आहे. जिल्ह्यात १२८१ जणांकडे शस्त्र परवाना होते. पोलीस अधीक्षकांनी आणखी ५ प्रस्ताव पाठवले असून १९ जणांच्या अर्जावर मात्र आक्षेप नोंदवला आहे.

# ईव्हीएममधील डेटा सुरक्षित ठेवा

## सर्वोच्च न्यायालयाचे निवडणुक आयोगाला आदेश; डेटा रिलोड किंवा हटवण्यास मनाई



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**ईव्हीएम व्हेरिफिकेशनसाठी धोरण बनवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. यावेळी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचे आदेश दिले आहेत. सध्या ईव्हीएमधून कोणताही डेटा हटवू नका किंवा रिलोड करू नका, असे आदेशच कोर्टाने निवडणूक आयोगाला दिले आहेत.**

ईव्हीएमवर विरोधकांनी सातत्याने संशय घेतला आहे. ईव्हीएममध्ये घोळ होत असून त्याचा फायदा थेट सत्ताधारी पक्षांना होत असल्याचे विरोधकांचे म्हणणे आहे. त्यासाठी सत्ताधाऱ्यांनी आणि इतरांनी सर्वोच्च न्यायालयात याचिकाही दाखल केल्या आहेत. त्यातच कोर्टात एक महत्त्वाची याचिका आली होती. ईव्हीएमच्या व्हेरिफिकेशन संबंधी एक पॉलिसी बनवण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. ईव्हीएमची मेमरी/मायक्रो कंट्रोलरची तपासणी आणि व्हेरिफिकेशनसाठी निवडणूक आयोगाला निर्देश देण्याची मागणी या याचिकेतून करण्यात आली होती. यावर कोर्टाने निवडणूक आयोगाला महत्त्वाचे आदेश दिले आहेत. ◀◀ पान २ वर

### कोर्टाचा नेमका आदेश काय?

यावर, आम्ही करण सिंह दलाल यांच्या याचिकेत हस्तक्षेप करण्यास इच्छूक नाही. आम्ही या याचिकेवर १५ दिवसानंतर सुनावणी करू. तोपर्यंत तुम्ही उत्तर दाखल करा. तसेच डेटा डीलिट करू नका आणि पुन्हा रिलोडही करू नका. फक्त चौकशी करू द्या, असे आदेशच सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी निवडणूक आयोगाला दिले आहेत. मतमोजणी नंतर पेपर ट्रेल्स हटवले जातात की तिथेच असतात? असा सवाल कोर्टाने केला. यावर प्रशांत भूषण म्हणाले की, पेपर ट्रेल्स ठेवले पाहिजे. ज्येष्ठ वकील देवदत्त कामथ यांनी मी सर्वमित्रच्या बाजूने बाजू मांडत आहे. संपूर्ण डेटा मिटवण्यात आला आहे. ज्या मशीनमध्ये व्होटिंग झाली होती, त्याची तपासणी झाली पाहिजे. असली नव्हे तर डमी युनिटची तपासणी झाली पाहिजे. प्रत्येक ईव्हीएमच्या तपासणीसाठी ४० हजार रुपये खर्च करण्यात येत आहेत. ही भरपाई उमेदवाराला करायची आहे. हे केवळ एक मॉक पोल आहे, असे कामथ म्हणाले.

### उशिरा याचिका का?

या याचिकेवर ज्येष्ठ अधिवक्ते मनिंदर सिंग यांनीही युक्तिवाद केला. विनाशर्त याचिका मागे घेतल्यावर अशी याचिका दाखल करण्याचा अधिकार निघून गेला होता. वकिलांच्या एका समूहाने ही याचिका दाखल केली आहे. अशी याचिका जस्टीस दीपांकर दत्ता यांच्या समोर आली होती. ती परत मागे घेतल्या गेली, असे मनिंदर सिंग म्हणाले. त्यावर जस्टिस दत्ता म्हणाले की, तुम्ही याचिका दाखल करण्यात एवढा उशीर का केला? त्यावर ज्येष्ठ अधिवक्ते गोपाल म्हणाले की, आधीची याचिका आणि आदेश संलग्न आहे. तर कामथ म्हणाले की, माझ्या याचिकेत म्हटलंय की, बीईएल इंजिनियरने डमी सिंबल आणि डेटा लोड केला आहे. मूळ मशीनचा डेटा साफ झाला आहे.

# ‘मनोज जरांगे माझे मित्र पण’

### मुख्यमंत्र्यांवर केलेल्या वक्तव्यावरून मंत्री उदय सामंतांचा सल्ला

**मुंबई । प्रतिनिधी**

**मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर घणाघाती टीका केली होती. यावर शिवसेनेचे नेते आणि मंत्री उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. इतकेच नाहीतर उदय सामंत यांनी मनोज जरांगे पाटील यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल बोलताना संयम बाळगण्याचा सल्लाही दिली आहे.**

‘मनोज जरांगे पाटील यांना माझे मित्र म्हणून विनंती करायची आहे, राज्याच्या मुख्यमंत्र्यांवर बोलताना जरा संयम ठेवून बोलले पाहिजे. कारणं ते राज्याचे मुख्यमंत्री आहेत. त्यांना जनतेने निवडून दिले आहे. कदाचित रागाच्या भरात असे होऊ शकते. पण मनोज जरांगे पाटील यांनी सरकारसोबत संवाद ठेवावा’, मनोज जरांगे पाटील यांच्या आरक्षणाच्या मागणीवर मंत्री उदय सामंत यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांच्या शासकीय बंगला आणि मुलीच्या परीक्षेवरूनही टीका केली. ◀◀ पान २ वर

# बीड शहरात खंडीत झालेल्या पाणीपुरवठ्यावर तातडीने व्यवस्था करा

## आ.संदीप क्षीरसागरांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरात सध्या रस्त्यांचे कामे चालू असल्याने पाईपलाइन नादुरुस्त झाली आहे. त्यामुळे बीड शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा होऊ शकत नसल्याने या भागातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन तातडीने व्यवस्था करण्याचे सूचित केले आहे.**



बीड नगरपालिका हद्द तसेच हद्दवाढ भागात रस्त्यांचे काम सुरू आहे. यासोबतच नगर रोड, राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरू आहे. या कामाच्या दरम्यान येथील पाइपलाइन नादुरुस्त झाली असल्याने शहरातील बालेपीर, गोरे वस्ती, रोशनपुरा यांसह इतर ठिकाणी पाणीपुरवठा खंडित झाला आहे. परिणामी नागरिकांचे पाण्याविना मोठे हाल होत आहेत. त्यामुळे बीड नगरपरिषदेला टँकर किंवा इतर व्यवस्था करण्यासाठी तातडीने आदेश ◀◀ पान २ वर

# तुळजाभवानी मंदिराच्या गर्भ गाभाऱ्याला गेले तडे

तुळजापूर । प्रतिनिधी

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मंदिराच्या गर्भ गाभाऱ्याच्या कोण शेळीला कडे गेले आहेत. त्यामुळे तुळजाभवानीची मूर्ती, गर्भ गाभारा व मंदिराचे शिखराला धोका निर्माण झाला आहे. मंदिराचे स्ट्रक्चर ऑडिट करून तात्काळ दुरुस्ती करावी असे निवेदन पुजारी मंडळांने मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी सचिन ओंबाशे यांना दिली आहे.

या निवेदनावर ५००० नागरिक व पुजाऱ्यांच्या सह्या आहेत. पुजारी मंडळाच्या वतीने आई तुळजाभवानीच्या मूर्ती रक्षणासाठी सह्यांची मोहीम राबवण्यात आली होती. त्यानुसार हे ५००० सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे. तसेच तुळजाभवानी मंदिराचा ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.११ फेब्रुवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू: ५१.०० क्विंटल | | |
| २,३५० | ३,२५१ | २,७८३ |
| ज्वारी/हायब्रिड: ८३.५० क्विंटल | | |
| २,०९१ | २,७०० | २,३०६ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | | |
| २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ११६.०० क्विंटल | | |
| ६,९०१ | ७,३७० | ७,२३२ |
| उडीद : २.०० क्विंटल | | |
| ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: ३०.५० क्विंटल | | |
| २,१५० | २,८०१ | २,५२१ |
| मुग : १.५० क्विंटल | | |
| ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: ५०.०० क्विंटल | | |
| ३,९०० | ४,०२१ | ३,९८० |
| हरभरा: २२.५० क्विंटल | | |
| ४,८०० | ५,८०१ | ५,५३५ |

# आता चेहराच बनेल तुमचे आधार कार्ड!

## बॅकींग ते हॉटेल बुकींगची सर्व कामे होतील जलद, सुरक्षित!

**मुंबई । प्रतिनिधी**

**तुमचा चेहराच तुमचे आधार कार्ड असेल, असे कोणी सांगितले तर त्यावर कोणाचा विश्वास बसणार नाही. पण ते खरे असून आता त्या दृष्टीने सरकार पाऊले टाकत आहे. बँकिंग ते हॉटेल बुकींगची सर्व कामे त्यामुळे जलद व सुरक्षित होणार आहेत.**




फेस ऑथेंटिकेशनद्वारे हे शक्य होणार आहे. ज्याद्वारे तुमची ओळख पडताळली केली जाईल. आता खाजगी कंपन्यादेखील आधार पडताळणी करू शकणार आहेत. जेणेकरून बँकिंग, प्रवास, आरोग्यसेवा आणि ई-कॉमर्स सारख्या सेवा ओळखपत्राचा पुरावा न दाखवता मिळू शकेल. आता सेवांसाठी आधार कार्ड किंवा प्रत्यक्ष कागदपत्रे दाखवण्याची आवश्यकता राहणार नाही. ओळखीची पडताळणी फक्त फेस ऑथेंटिकेशनद्वारे केली जाईल. ज्यामुळे प्रक्रिया जलद आणि त्रासमुक्त होईल. पूर्वी आधार प्रमाणीकरण फक्त सरकारी सेवांपुरते मर्यादित होते. परंतु आता ही सुविधा खासगी कंपन्यांनाही देण्यात आली आहे. ई-कॉमर्स, प्रवास, आतिथ्य, आरोग्यसेवा, बँकिंग आणि विमा यासारख्या क्षेत्रातील खासगी कंपन्या आता आधार प्रमाणीकरणासह सेवा देऊ शकतील. आता प्रवास, हॉटेल बुकिंग, आरोग्यसेवा आणि बँकिंग यासारख्या सेवांचा लाभ घेण्यासाठी ओळखपत्राची आवश्यकता नाही. फक्त कॅमेऱ्यासमोर तुमचा चेहरा दाखवल्याने, प्रमाणीकरण पूर्ण होईल आणि सेवा त्वरित उपलब्ध होईल. बनावट कागदपत्रे किंवा चुकीच्या ओळखीची समस्या संपतील. कारण चेहरा ओळखणे म्हणजेच फेस आयडेंटिफिकेशन ही सर्वात सुरक्षित पद्धत आहे. जलद, अचूक आणि पूर्णपणे सुरक्षित प्रमाणीकरण नागरिकांना विश्वासार्ह ◀◀ पान २ वर

### सोप्या आणि जलद सेवा

सोप्या आणि जलद सेवा जीवन सुलभतेला प्रोत्साहन दिले जाणार आहे. आधार प्रमाणीकरणाची व्याप्ती वाढवल्याने नागरिकांचे जीवन सोपे होईल. कमी कागदपत्रे, जलद सेवा आणि अधिक सुरक्षिततेसह सेवा आता अधिक सोयीस्कर होतील.

### डेटा पूर्णपणे सुरक्षित

फेस ऑथेंटिकेशनची व्याप्ती झपाट्याने वाढत आहे. अशावेळी चेहरा आधारित प्रमाणीकरण हे सरकार मान्यताप्राप्त आणि पूर्णपणे सुरक्षित असेल. संमतीशिवाय डेटा कुठेही वापरला जाणार नाही. तुमच्या गोपनीयता राखली जाणार आहे. या दुरुस्तीमुळे सरकार आणि खासगी कंपन्यांमधील भागीदारी मजबूत होणार आहे. ज्यामुळे नवीन उपक्रम आणि डिजिटल सेवा वाढतील. नागरिकांना चांगल्या, जलद आणि पारदर्शक सेवांचा फायदा होणार आहे.

# उद्धव ठाकरेंना बसणार मोठा धक्का

## दिल्लीत घडामोडींना वेग

**मुंबई । प्रतिनिधी**

**शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्यामध्ये शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे नेते व पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या हेमलता पाटील या देखील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हेमलता पाटील यांच्यासह शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे काही नगरसेवक देखील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हे सर्व प्रवेश होणार असल्याची माहिती समोर येत आहे.**

येत्या काही दिवसांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. ऐन निवडणुकीच्या तोंडावर शिवसेना ठाकरे गटाला धक्क्यावर धक्के बसत आहेत. पुण्यातील काही नगरसेवकांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. त्यानंतर छत्रपती संभाजीनगरमध्ये देखील शिवसेना ठाकरे गटाला धक्का बसला आहे. अनेक नेत्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्यानंतर आता मोठी बातमी समोर आली आहे. ती म्हणजे सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार आता शिवसेना ठाकरे गटाला आणखी एक धक्का बसण्याची शक्यता आहे. उपमुख्यमंत्री ◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# हेकेखोर मुख्यमंत्र्याचा अखेर राजीनामा !

मणिपूरचे मुख्यमंत्री, माजी फुटबॉलपटू आणि माजी पत्रकार एन. बिरेनसिंह यांनी अखेर आपल्या पदाचा राजीनामा राज्यपालांच्याकडे सोपवला आहे. १४ आमदार आणि भाजप नेते संदीप पात्रा यांच्यासोबत जाऊन त्यांनी राजीनामा सोपवला. याचा अर्थच ते तेव्हाही सहजासहजी खुर्ची सोडायला तयार नसावेत. दिल्लीत बोलवून त्यांना राजीनामा द्यायला सांगितला गेला आणि देतात की नाही हे पाहणीसाठी पात्रा यांना मुराळी म्हणून पाठविले गेले. मणिपूर विधानसभेत काँग्रेसने आणलेल्या अविश्वास ठरावानंतर परिस्थिती इतकी बिकट बनली की त्यांना काढून टाकले असे न भासवता पद सोडायला लावण्यात आले असावे हे स्पष्टपणे दिसते. तब्बल ३४ महिने मणिपूर जातीय दंगलीत होरपळतो आहे. या दरम्यान अनेक प्रसंग आले जेव्हा केंद्र सरकारनेच त्यांना पदावरून हाकलून लावले पाहिजे होते. आपला राजकीय स्वार्थ साधण्यासाठी दोन जातींमध्ये प्रचंड तेढ निर्माण करून पोळी भाजून घेण्याच्या प्रयत्नात सगळे मणिपूर भाजले आणि मुख्यमंत्र्यांचे तोंडही काळवंडले असे म्हणावे लागेल. पण हे सगळे इतक्यावर थांबले नाही. गेल्या लोकसभेच्या शेवटच्या अधिवेशनात पंतप्रधान मोदी यांच्यावर विरोधकांनी अविश्वास ठराव आणला. तो फेटाळला जाणार हे माहीत असताना देखील त्यावर राष्ट्रीय चर्चा घडविण्यासाठी ते करावे लागले. मणिपुरी महिलांची भर रस्त्यात झालेली विटंबना, कारगिल युध्दातील वीर सेनानीने मी देश वाचवला पण पत्नीची अब्रू वाचवू शकलो नाही अशा शब्दात व्यक्त केलेला शोक संपूर्ण देशाला अस्वस्थ करून गेला. पण जो याने अस्वस्थ व्हायला हवा होता तो तिथला राज्यकर्ता वीरेंद्र सिंह मात्र आपण राजीनामा देणार नाही याच मतावर ठाम राहिले. बरं पदावर बसून त्यांनी परिस्थिती शांत केली असेही झाले नाही. अविश्वास ठरावावर बोलताना पंतप्रधानांनी मणिपूर शांत होत आहे असा दावा केला. मात्र निर्वासितांच्या छावण्यांमध्ये परिस्थिती बदलली नाही. उलट घरे जळलेली, आपली माणसे हरवलेली गर्दी त्या छावण्यांमध्ये वाढतच राहिली. पंतप्रधान बोलले तरी त्यांना देण्यात आलेली माहिती चुकीची असल्याचे पुढे स्पष्ट झाले.

लोकसभा निवडणूक निकाल हाती पडल्यावर भाजपच्या राष्ट्रीय मार्गदर्शक सरसंघचालक मोहन भागवत यांनीही मणिपूर शांत व्हायची वाट पाहतंय, त्याला प्राधान्य दिले पाहिजे अशी सरकारला आणि मोदी यांना आठवण करून दिली. ही मोठी नामुष्की ओढवली ती मणिपूरच्या मुख्यमंत्री महोदयांच्या कारभारामुळे. एक राष्ट्रीय फुटबॉलपटू आणि कधीकाळी मणिपूरातील तरुणांच्या मनातील शब्द कागदावर उतरवून त्यांनी आपले महत्त्व निर्माण केले होते. मात्र २०१७ पासून मुख्यमंत्री पदावर विराजमान झाल्यानंतर ही खुर्ची प्रदीर्घकाळ आपल्या बुडाखालून हलली नाही पाहिजे यासाठी त्यांनी ज्या पद्धतीचे राजकारण केले आणि त्याच काळात ज्या पद्धतीने वातावरण बिघडत गेले त्यामुळे मणिपूरची परिस्थिती खूपच दयनीय झाली. ३ मे २०२३ या तारखेपासून मैतेयी आणि कुकी या दोन जातींमध्ये भडकलेला हिंसाचार सर्वसामान्यांना आगीत लोटणारा ठरला. अनेक स्त्रियांचे झालेले विनयभंग आणि दुष्कृत्ये संपूर्ण जगात धिक्कारली गेली. मात्र तरीसुद्धा गुळाला मुंगळा चिकटल्याप्रमाणे एन. बिरेनसिंह आपल्या पदाला कवटाळून राहिले. राज्यातील मंत्र्यांची, आमदारांची घरे लोकांनी पेटवली, सर्व घटकातील माणसांचे विस्थापन या काळात मणिपूरने अनुभवले. यात किती मेले आणि किती जळून कोळसा झाले याची मोजणी करणे अवघड. अशा काळात तिथली परिस्थिती हाताळण्यासाठी केंद्रीय गृहमंत्र्यांना सुद्धा अपयश आले आणि खुद्द पंतप्रधानांना एकदा मणिपूरला जाऊन दाखवा असे आव्हान दररोज दिले जाऊ लागले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे पंतप्रधानांना खरोखरच मणिपूरमध्ये जाणे मुश्किल झाले आहे. दोन जातींमध्ये इतका तणाव वाढला आहे की त्यामध्ये कोणाचीही बाजू घेणे किंवा कोणालाही समजावून सांगणे हे केंद्र सरकारच्या हाताबाहेर गेलेले आहे. या जनतेला विश्वास तरी द्यायचा कसा आणि त्यांचा राग शांत करून त्यांना सामान्य जीवन जगण्यास तयार तरी कसे करायचे? हा आज देशासमोर प्रश्न निर्माण झाला आहे. एखाद्या प्रकरणात विरोधकांनी राजकारण करू नये असे आवाहन सत्ता पक्ष करत असतो. पण, या प्रकरणात राजकारण केले नसते तरीसुद्धा सत्ता पक्षाला काही मार्ग काढता येईल अशी वाटच मोकळी राहिली नव्हती. लोक ज्या पध्दतीने एकमेकांच्या जीवावर उठले आहेत यातून वाचणार कोण आणि परिस्थिती सुधारणार कशी? याचे उत्तर आज देखील कोणाकडे नाही. एन. बिरेनसिंह यांच्या राजीनाम्यानंतर एखादा गट तरी शांत व्हावा अशी अपेक्षा आहे. आपल्या राजकारणासाठी लोकांमध्ये तेढ निर्माण करणे सोयीचे असते. पण, आग भडकल्यानंतर तो वाद हाताळणे हा नेतृत्वाच्याही आवाक्याचा भाग राहत नाही. मणिपूरमध्ये योग्य वेळेला राज्यकर्त्यांनी आपली भूमिका समजून हस्तक्षेप केला असता तर ही वेळ आली नसती. आता इथे एकाच राज्यात दोन देशांच्या प्रमाणे सीमा निर्माण झाली आहे. हाती शस्त्र असलेले दोन समाजाचे लोक आपापला भाग वाचवत असल्याच्या आविर्भावात हिंसक घटना घडवत चालले आहेत. माध्यमे जरी याकडे दुर्लक्ष करत असली तरी समाज माध्यमावर या गोष्टी आता लपून राहिलेल्या नाहीत. सर्वसामान्य आणि निष्पाप लोक यात हकनाक बळी गेले आहेत. जात आहेत. सगळीकडे एक प्रकारची दहशत आहे. जळलेली घरे, इमारती, वाहने, काळवंडलेला भोवताल घेऊन एक असुरक्षित जीवन तिथे लोक जगत आहेत. कधी हिंसा सुरू होईल आणि कधी जीव जातील याचे डोंगरी आणि मैदानी दोन्ही भागात निश्चितपणे सांगणे मुश्किल झाले आहे. इतके कटू अनुभव घेतल्यानंतर लोकांची मने सांधणे जवळपास मुश्किल आहे. एन. बिरेनसिंह गेले तरी त्यांचा दुर्दैवी सत्ताकाळ त्या प्रदेशाला नेहमीच एका निगरगट्ट राजकारण्याची आठवण देत राहील ज्याने आपल्या भागाचे नरकात रूपांतर केले.

## बदनापूर बस स्थानकात आगार प्रमुख व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी!

● भाऊसाहेब घुगे यांची परिवहन मंत्र्यांकडे मागणी



**जालना । प्रतिनिधी**

**नव्याने बांधण्यात आलेल्या बदनापूर बस स्थानकात आगार प्रमुख आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून बससेवा सुरू करावी. अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.**

मंगळवारी ( ता. ११) मंत्रालयात परिवहन मंत्र्यांची भेट घेऊन भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर बसस्थानकात आवश्यक सोयी- सुविधा पुरविण्याबाबत सविस्तर चर्चा करून लेखी निवेदन दिले. जालना- छत्रपती संभाजी नगर महामार्गावर तालुक्याचे ठिकाण असलेल्या बदनापूर येथे बस स्थानक उभारणी बाबत अनेक वर्षांपासून रेंगाळत पडलेला प्रश्न उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी सोडवला. आचारसंहितेपूर्वी बस स्थानकाचे लोकार्पणही करण्यात आले. मात्र अद्यापर्यंत येथे बस सेवा सुरू झाली नाही. शालेय विद्यार्थी तसेच तालुक्यातील जनतेच्या सुविधांसाठी अगार प्रमुख आणि कर्मचारी नियुक्ती करून येथे बस सेवा सुरू करण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत. अशी आग्रही मागणी भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली.

# एआयने नोकऱ्या जाणार?

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी फ्रान्समध्ये व्यक्त केली भिती

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पंतप्रधान नरेंद्र मोदी फ्रान्सच्या दौऱ्यावर आहेत. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युअल मॅक्रो यांच्या सोबत त्यांनी बहुप्रशिक्षित एआय एक्शन परिषदेचे सह अध्यक्ष पद भूषवले आहे या एआय शिखर संमेलनात सहभाग घेताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एआय तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यापासून सावध देखील राहणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे. शिवाय एआयमुळे नोकऱ्या जाणार असल्याची भीती पंतप्रधान मोदींनी व्यक्त केली.**



एआयची जागतिक परिषद फ्रान्सच्या पॅरीस येथे भरली आहे. या एआय परिषदेत भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषण केले आहे. आर्टीफिशियल तंत्रज्ञानाचा वेगाने विकास होत आहे. या तंत्रज्ञानामुळे धोके जरी वाढले असले तरी त्याचा उपयोग शिक्षण, आरोग्य, तंत्रज्ञान आणि इतर मानवी कामांसाठी करणे गरजेचे आहे. एआयमुळे नोकऱ्या जातील ही मोठी भीती व्यक्त होत आहे. परंतू प्रत्येक नवीन तंत्रज्ञान आले तेव्हा अशीच भीती व्यक्त केली गेली. परंतू नवीन तांत्रिक नोकऱ्या उपलब्ध होतच गेल्या त्यामुळे एआय तंत्रज्ञानाला न घाबरता त्याचा उपयोग दैनंदिन गरजांसाठी करणे गरजेचे आहे. खास करुन शाश्वत विकासासाठी त्याचा उपयोग आपल्याला करता आला पाहिजे असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या परिषदेत संबोधताना म्हटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढे म्हणाले की, 'आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा विकास वेगाने होत आहे. भारत या क्षेत्रातील आपला अनुभव आणि विशेषत: शेअरिंग करण्यासाठी तयार आहे हे म्हणजे एआयचे भविष्य सर्वासाठी चांगले होईल. आम्ही सार्वजनिक भल्यासाठी एआय एप्लीकेशन विकसित करीत आहोत. भारताने आपल्या १.४ अब्ज लोकसंख्येसाठी एकदम कमी भांडवलात डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधेला यशस्वीपणे तयार केले आहे. आम्हाला एआय संदर्भातील मुद्द्यांचा निपटारा करण्यासाठी जागतिक मानकांची गरज आहे.

### नोकऱ्या जातील ही भीती निराधार

एआयने सायबर गुन्हेगारी संदर्भातील धोके निर्माण झाले आहेत. तसेच फेक न्यूज आणि इतरही धोके दिसत आहेत. सायबर सिक्युरिटी, डीपफेक असे धोके आहेतच त्यासाठी एक निती ठरविण्याची गरज आहे. एआयने नोकऱ्या जातील ही सर्वात मोठी भीती आहे. परंतू इतिहास याला साक्षी आहे जेव्हा कोणतेही तंत्रज्ञान येते तेव्हा नोकऱ्या जात नाहीत उलट कामाचे स्वरुप बदलते आणि नव्या पद्धतीचे जॉब आपोआप तयार होतात असेही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी सांगितले.

### फ्रान्ससोबत शाश्वत विकास करु

मानवी मेंदू कविता करु शकतो आणि स्पेस शिप देखील तयार करु शकतो. एआय तंत्रज्ञानाने आपण या गोष्टी देखील करु शकतो आणि आपला शाश्वत विकास देखील करु शकतो. डेटा प्रायव्हसी हे मोठे आव्हान आहे. परंतू सर्वसामान्यासाठी आणि शाश्वत ऊर्जा सौर ऊर्जच्या क्षेत्रात आज फ्रान्स सोबत आम्ही काम करीत आहोते. ग्रीन पॉवर हे उद्याचे भविष्य आहे. त्यासाठी फ्रान्सचे आम्हाला सहकार्य हवे असेही ते यावेळी म्हणाले.

# गेवराईत कर्तुत्वान मातांचा गौरव

**गेवराई । प्रतिनिधी**

येथील ,भाऊ- बाबा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या अठराव्या कीर्तन महोत्सवात महंत नामदेव महाराज आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या हस्ते कर्तुत्वान मातांचा गौरव करण्यात आला. यावेळी किर्तन महोत्सवाचे प्रमुख संयोजक माधव चाटे, ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार, सामाजिक कार्यकर्ते जे डी शहा,प्रख्यात वक्ते राहुल गिरी, पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी वसंत मुंडे यांनी आई हेच जगातील एकमेव आणि सर्वात मोठे तीर्थक्षेत्र असल्याचे सांगत कर्तृत्ववान मातांचा गौरव केल्याबद्दल माधव चाटे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक केले.



गेवराई : श्रीक्षेत्र चाकरवाडीचे गुरुवर्य तपोनिधी ह.भ.प.महादेव महाराज (तात्या) यांनी हॉटेल श्रीकृष्ण फॅमिली रेस्टॉरंट येथे सदिच्छा भेट देवून शुभाशीर्वाद दिले. यावेळी हॉटेल श्रीकृष्णचे प्रोप्रायटर अशोक कदम, पत्रकार विनोद पौळ, अशोक जाधव, अंबादास गिरी, शुभम कदम सह आदी उपस्थित होते.



# मंडळ अधिकाऱ्याने शेतकऱ्यांना ठेवले रस्त्यापासून वंचित

## अनेक शेतकऱ्यांची रस्त्याच्या अडचणी मुळे जमीन पडीक

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

**किल्ले धारूर येथील सर्वे नंबर ६२८ मध्ये अनेक शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न होता सन्मानिय तहसीलदार यांनी रस्ता खुला करण्यासाठीचे आदेश देऊन सुद्धा पोलीस संरक्षण मोक्यावर असून सुद्धा मंडळ अधिकारी कपिल गोडसे यांनी मनमानी करत आज दिवसभर टाळाटाळ करत रस्ता मोकळा केला नाही . जवळपास २० ते २५ शेतकरी आज दिवसभर रस्त्यासाठी ताटकळत उभे होते . मंडळ अधिकारी श्री कपिल गोडसे यांनी रस्ता अडविणाऱ्या सोबत संगणमत केलं आहे असा आरोप संबंधित शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे.**

मंडळ अधिकारी यांनी अप्पर जिल्हा श्री शिवकुमार स्वामी व तहसीलदाराच्या आदेशाला केराची टोपली दाखवल्याने पीडित शेतकऱ्यांनी धारूर तहसीलच्या मुख्य प्रकाश प्रवेशद्वारावर आपले आक्रोश जाहीर केले. रस्ता नाही झालं तर शेतकऱ्यावर आत्मदहनाची वेळ आहे असं त्यांचं म्हणणं आहे . तहसीलदार साहेबांचे स्पष्ट आदेश असताना सुद्धा मंडळ अधिकारी कपिल गोडसे यांनी संगणमत करून जाणून भोजन रस्ता खुला केला नाही महसूल प्रशासनाने कपिल गोडसे या मंडळ अधिकाऱ्यावर कारवाई करावी अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे. किल्ले धारूर येथील धारूर तेलगाव रोड लगत सर्वे नंबर ६२८ मधील शेतकरी मोहंमद खान शमशिर खान, मुंजाबा एकनाथ शिंदे, नवनाथ मुंजाबा शिंदे, शेख तय्यब अब्दुल व शेख रसूल अब्दुल यांनी या सर्वे नंबर मधील शेतकरी व मूळ मालक पठाण सिराज खान सरवर खान व पठाण रियाज खान सरवर खान व ईतर अनेक शेतकऱ्यांसाठी असलेला वाहिवाटीतील आणि गेल्या ५० वर्षांपासून उपयोगात असलेला रस्ता गेल्या काही वर्षांपासून बंद केल्यामुळे मोहंमद खान याच्या हिश्श्याच्या पाठीमागील वाटनिधारक व ईतर शेतकऱ्यांचा रस्ता बंद झाला या मुळे पिढीत शेतकऱ्यांनी मा. तहसिलदार यांचेकडे न्याय मागितला प्रकरण तहसिलदार, अप्पर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी आयुक्त पर्यंत जाऊन रस्ता मोकळा होवावा या साठी आदेश झाले नंतर सन्मानीय तहसिलदार यांनी मंडळ अधिकारी यांना पोलीस प्रशासनाचे संरक्षण घेउन रस्ता खुला करून द्यावा असे आदेशित केले .यासाठी पिढीत शेतकऱ्यांनी धारूर पोलीस स्टेशन येथे पोलीस बंदोबस्तासाठी २०००० रुपये शुल्क ही भरले. त्यानुसार आज ११ फरवरी २०२५ रोजी रस्ता मोकळा करण्याची कारवाही होणार होती. पोलीस कर्मचारी, मंडळ अधिकारी मोक्यावार आले परंतु मंडळ अधिकारी यांनी दिवसभर टाळाटाळ केली थांबा करतो, थांबा करतो म्हणत दिवस घालविला त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी तहसील गाठत तहसील कार्यालय समोर आक्रोश जाहीर केले व रस्ता मोकळा झाला नाही तर तहसील समोर आत्मदहन केल्याशिवाय आमच्या कडे पर्याय नाही अशी प्रतिक्रिया शेतकऱ्यांनी दिली तसेच मंडळ अधिकारी कपिल गोडसे यांनी संगनमत करून शेतकऱ्यांना हक्काच्या रस्त्यापासून



वंचित ठेवले या मुळे मा. जिल्हाधिकारी यांनी मंडळ अधिकारी यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी या वेळी करण्यात आली. या वेळी पिढीत शेतकरी शेख गुलाब, शेख जीलानी, शेख हमीद, बाबुराव अण्णा भालेकर, शेख दुलू सह अनेक शेतकरी उपस्थित होते. या विषयात गेल्या महिन्यात शेतकऱ्यांच्या वतीने रस्त्यासाठी उपोषण करण्याची भूमिका घेण्यात आली होती यावर अप्पर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी मा. तहसिलदार यांना रस्ता खुला करण्याविषयी आदेशित केले होते. त्यानुसार तहसिलदार यांनी मंडळ अधिकारी यांना रस्ता मोकळा करून घेण्याविषयी २४/०१ / २५ रोजी आदेशीत केले होते . परंतु मंडळ अधिकारी कपिल गोडसे यांनी अप्पर जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व मा. तहसिलदार यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवली आहे. जालना (प्रतिनिधी) : नव्याने बांधण्यात आलेल्या बदनापूर बस स्थानकात आगार प्रमुख आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून बससेवा सुरू करावी. अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे. मंगळवारी ( ता. ११) मंत्रालयात परिवहन मंत्र्यांची भेट घेऊन भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर बसस्थानकात आवश्यक सोयी- सुविधा पुरविण्याबाबत सविस्तर चर्चा करून लेखी निवेदन दिले. जालना- छत्रपती संभाजी नगर महामार्गावर तालुक्याचे ठिकाण असलेल्या बदनापूर येथे बस स्थानक उभारणी बाबत अनेक वर्षांपासून रेंगाळत पडलेला प्रश्न उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी सोडवला. आचारसंहितेपूर्वी बस स्थानकाचे लोकार्पणही करण्यात आले. मात्र अद्यापर्यंत येथे बस सेवा सुरू झाली नाही. शालेय विद्यार्थी तसेच तालुक्यातील जनतेच्या सुविधांसाठी अगार प्रमुख आणि कर्मचारी नियुक्ती करून येथे बस सेवा सुरू करण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत. अशी आग्रही मागणी भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली.

## पान १वरून...

### नाफेडची खरेदी बंद;

सोयाबीन तशीच पडून आहेत. त्यातच सोयाबीन खरेदीला मुदतवाढ मिळेल की नाही या प्रतिक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. सोयाबीन खरेदीसाठी केंद्राकडून मुदतवाढ नाही. राज्य पणन विभागाने असे स्पष्टीकरण दिले आहे. नियमानुसार ९० दिवसांचा कालावधी संपल्यानंतर आणखी २४ दिवसांची मुदतवाढ दिली होती, अशी सबब पुढे करत आता कृषी विभाग, पणन खाते हात झटकण्याचा प्रयत्न करत आहेत. सोयाबीन खरेदीसाठी मुदतवाढ न देण्याचा पवित्रा पणन खात्यानं घेतल्याने शेतकऱ्यांची मोठी गोची झाली आहे.

-----------

### ईव्हीएममधील डेटा

सध्या ईव्हीएम मशीनमधील डेटा डीलिट करू नका किंवा तो रिलोडही करू नका, असे आदेशच कोर्टाने आयोगाला दिले आहेत. असोसिएशन ऑफ डेमोक्रॅटिक रिफॉर्म्सने ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सरन्यायाधीश संजीव खन्ना यांनी हे कशासाठी आहे? असा सवाल केला. त्यावर वकील प्रशांत भूषण यांनी कोर्टाला उत्तर दिले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार ईसीआयला जी प्रक्रिया अवलंबायला हवी होती, ती त्यांच्या मानक संचालन प्रोटोकॉलनुसार असली पाहिजे. ईव्हिएम सॉफ्टवेअर आणि हार्डवेअरची तपासणी झाली पाहिजे आम्हाला वाटते. कारण हार्डवेअर आणि सॉफ्टवेअरमध्ये कशा पद्धतीची हेराफेरी झाली आहे, हे आम्हाला पाहायचे आहे, असे प्रशांत भूषण यांनी कोर्टाला सांगितले.

-------------

### तुळजाभवानी मंदिराच्या

मूळ गर्भ गाभारा काढून त्या ठिकाणी प्रशस्त मोठा गाभारा निर्माण करावा अशी मागणीही या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तुळजाभवानी मंदिराच्या गर्भ गाभाऱ्याच्या शिळाना तडे जाण्याची घटना गंभीर आहे याकडे गांभीर्याने बघा अशा सूचनाही पुजारी मंडळांनी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांना केल्या आहेत.

----------

### बीड शहरात खंडीत झालेल्या

द्यावेत अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकार्यांना पत्राद्वारे कळविले आहे.

----------

### 'मनोज जरांगे माझे मित्र पण'

'सागर बंगल्यावरून मुलीच्या परीक्षेसाठी वर्षावर जाता येत नाही तुम्ही म्हणाले. तुम्हाला तुमच्या पोरीच्या भवितव्याची चिंता आहे. इकडे आमच्या पोरांचे मुडदे पडायला लागलेत. आमचे उपोषण खोटं सांगून तुम्ही गोड बोलून आमचा काटा काढला', असे जरांगे पाटील यावेळी म्हणाले होते.

-----------

### उद्धव ठाकरेंना

एकनाथ शिंदे यांच्या दिल्ली दौऱ्यामध्ये शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे नेते व पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या हेमलता पाटील या देखील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत, सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार हेमलता पाटील यांच्यासह शिवसेना ठाकरे गट आणि काँग्रेसचे काही नगरसेवक देखील शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत हे सर्व प्रवेश होणार असल्याची माहिती समोर येत आहे.

-----------------

### आता चेहराच बनेल

सेवा प्रदान करेल. ज्यांना किंवा कागदपत्रे हाताळण्यात अडचण येते अशा वृद्ध आणि निरक्षर लोकांसाठी ही सर्वात सोपी पद्धत असेल. आता फक्त फेस स्कॅनद्वारे सेवा मिळू शकतात.

-----------------

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १२ फेब्रुवारी २०२५



## शिधापत्रिका धारकांनी ई-केवायसी व मोबाईल सिडींग करून घ्यावी: तहसीलदार सोनाली जोंधळे

**मंठा । प्रतिनिधी**

**तालुक्यातील शिधापत्रिका धारक ग्राहकांनी ई-केवायसी करुन घ्यावे, असे आवाहन तहसिलदार सोनाली जोंधळे व पुरवठा नायब तहसीलदार विकास राजपुत यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.**

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाअंतर्गत राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजने अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब योजना अंतर्गत पात्र शिधापत्रिका धारकांना शासकीय धान्याचा लाभ सुरु ठेवण्यासाठी लाभार्थ्यांनी ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यासाठी १० फेब्रुवारीपासून २८ फेब्रुवारीपर्यंत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. कुटुंबातील रेशनकार्डमध्ये नोंदणी केलेल्या सर्व पात्र लाभार्थ्यांनी स्वतःचे आधारकार्ड व रेशनकार्ड सोबत नेवून आपल्या गावातील स्वस्त धान्य दुकानदारांशी संपर्क करुन तात्काळ आपले ई-केवायसी पुर्ण करुन घ्यावे. केवायसी करण्यासंबधीत लाभार्थी यांनी रास्तभाव दुकानात समक्ष उपस्थित राहून पॉस मशीनवर बायोमॅट्रीक करावे. ई-केवायसी पुर्ण न केल्यास अन्न धान्याचा लाभ बंद होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. ई. केवायसी पुर्ण न केल्यामुळे अन्न धान्याचा लाभ बंद झाल्यास त्याची जबाबदारी ही संबधीत लाभार्थ्यांची राहील याची नोंद घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जवळगाव येथील परिषदेत गायरान धारकांची वज्रमूठ

## एकनाथराव आवाड यांचा वंचितांसाठीचा लढा आपण पुढे नेत आहात - गयाताई आवाड

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**जवळगाव येथे रविवारी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गायरान हक्क परिषदेत ८ ठराव घेण्यात आले. परिषदेस गायरान धारकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तर यावेळी उद्घाटक म्हणून बोलताना दिवंगत एकनाथराव आवाड यांचा वंचितांसाठीचा लढा आपण पुढे नेत आहात याचा आनंद आहे. या लढ्यात आवाड कुटुंब आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे असे प्रतिपादन माजी समाज कल्याण सभापती गयाताई आवाड यांनी केले.**




महाराष्ट्रातील गायरानाच्या प्रश्नाला वाचा फोडण्यासाठी महाराष्ट्रातील गायरानावर काम करणाऱ्या संघटना, संस्था, पक्ष यांच्या प्रतिनिधींनी व गायरानधारकांनी जवळगाव येथे रविवार, दिनांक ९ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय गायरान हक्क परिषदेस मोठ्या संख्येने उपस्थित राहून परिषद यशस्वी केली. या परिषदेचे उद्घाटन माजी समाज कल्याण सभापती गयाताई आवाड यांनी केले. तर परिषदेच्या अध्यक्षस्थानी अशोक पालवे (संस्थापक अध्यक्ष, युवा आदोलन) तर यावेळी बालाजी शिंदे (नांदेड), सरपंच भगवान हारे (जवळगाव), नवनाथ हारे (पोलिस हक्क संघटना), आत्माराम हारे (मच्छीमार सोसायटी, जवळगाव), श्रावण क्षीरसागर, विष्णू आचार्य, दशरथ सोनवणे (देवळा) यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी कॉ.बब्रुवाहन पोटभरे (निमंत्रक, जातीअंत संघर्ष समिती), ज्येष्ठ नेते धर्मा मिसाळ, नागनाथ चव्हाण (संस्थापक अध्यक्ष, वंचित हक्क आंदोलन), बजरंग ताटे (अध्यक्ष, लाल पँथर) यांनी आपले मनोगत व्यक्त केले. परिषदेची सुरूवात महामानवांच्या प्रतिमापूजन आणि चळवळीच्या गीताने झाली. परिषदेच्या प्रवेशद्वाराला कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे तर विचारपीठाला एकनाथराव आवाड (जिजा) यांचे नांव देण्यात आले होते. यावेळी बोलताना बजरंग ताटे यांनी आपण गायरान सोडायचे नाही. शासनाने गायरान लीझवर देवू नये, गायरानावर घरे बांधा, गायरानाचा लढा आपण एकत्र मिळून लढू असे सांगितले. तर नागनाथ चव्हाण यांनी निझामाच्या हैदराबाद स्टेटचे विविध दाखले, संदर्भ दिले. गायरानधारकांना बेदखल करणे योग्य नाही. सरकार स्वतःच्या परिपत्रकांची अंमलबजावणी न करता पायमल्ली करीत आहे असे सांगितले. आगामी काळात सामुहिक लढा लढण्यासाठी एक समिती तयार करू असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना अशोक पालके म्हणाले की, जिजा असताना प्रशासनावर चळवळीचा धाक होता. आज जिजांसारखा धाक प्रशासनावर निर्माण करावा लागेल. हैदराबाद गॅझेट ग्राह्य धरून मराठवाड्यातील दलितांना सातबारा उतारा द्यावा, याप्रश्नांवर आगामी विधीमंडळ अधिवेशनावर गायरान धारकांचा धडक मोर्चा काढला जाईल, विधीमंडळाला घेराव घालणार आहोत. जिल्हाधिकारी यांना चुकीचा अहवाल देणारांवर कार्यवाही करून जवळगाव येथे आदित्य ग्रीन कंपनीबरोबरचा करार रद्द करा असे आवाहन पालके यांनी केले. परिषदेत सर्वानुमते एकूण आठ ठराव मंजूर करण्यात आले. ठरावांचे वाचन सुभाष चव्हाण, बालाजी शिंदे, बलभीम हजारे, महेश जोगदंड, दयानंद कांबळे, राहुल गंडले, भगिरथ कोरडे, नकेश कांबळे यांनी केले. या ठरावांना नारायण जोगदंड, अंकुश चिकटे, पांडुरंग हजारे, बालाजी कांबळे, बाळू हारे, महेश जोगदंड, शहाजी उदार आणि महादेव उदार यांनी अनुमोदन दिले. परिषदेचे प्रास्ताविक भिमशक्तीचे जिल्हा संघटक धीमंत राष्ट्रपाल, सुत्रसंचालन हनुमंत गायकवाड (मानवी हक अभियान) यांनी केले तर उपस्थितांचे आभार गणेश टेकाळे यांनी मानले. परिषदेच्या यशस्वितेसाठी बाळासाहेब हारे, अलका हजारे, लक्ष्मी आगळे, करूणा आगळे, सत्यभामा कोकणे, सुवर्णा लोणकर, निकिता कांबळे, वसंतराव उदार, विठ्ठल कांबळे यांनी पुढाकार घेतला. या परिषदेसाठी केज, कळंब, परळी, अंबाजोगाई, लातूर, रेणापूर, अहमदपूर, जळकोट, देगलूर, वडवणी, धारूर, माजलगाव, गेवराई, अंबड, गंगाखेड, सोनपेठ या तालुक्यांतून गायरानधारक स्त्री, पुरूष व कार्यकर्ते उपस्थित होते.

## लीनेन्स क्लब आंबाजोगाईच्या स्तन कर्करोग महिला जागरण मोहिमेचा शुभारंभ

आंबाजोगाई । प्रतिनिधी

लीनेन्स क्लब आंबाजोगाईच्या कॅन्सर विषयी महिला जागरण मोहिमेचा प्रारंभ लातूर येथे झालेल्या लीनेन्स क्लबच्या राज्य स्तरीय मेळाव्यात करण्यात आला. या प्रसंगी कॅन्सर पासून सुरक्षित राहण्याच्या सूचनांचे पत्रक प्रकाशित करण्यात आले. त्यात आंबाजोगाईच्या अर्चना स्वामी या कर्करोग ग्रस्त महिलेचे निवेदन आहे.



लीनेन्स क्लबच्या राज्यस्तरीय पदाधिकाऱ्यांचा शपथविधी, कॅबिनेट मिटिंग आणि पी.एस.टी. सेमिनार असा भरगच्च कार्यक्रम लातूर येथील वाडा हॉटेल येथे पार पडला. लीनेन्स डॉ मंजिरी कुलकर्णी व सुनीला नरपन्नवार यांची विशेष उपस्थिती होती. राज्यातील २९ क्लब्सचे पदाधिकारी उपस्थित होते.

अहिल्या गाठाळ यांचा सत्कार माँ से बेटी सवाई हा लीनेन्स क्लबचा उपक्रम आहे. त्यात लीनेन्स क्लबच्या सदस्यांच्या कर्तबगार कन्येचा सत्कार केला जातो. आंबाजोगाई लिलेन्स क्लबच्या कोषाध्यक्ष अयोध्या गाठाळ यांची कन्या, आंबाजोगाईची भूमीकन्या आणि लातूरच्या उपविभागीय अधिकारी अहिल्या गाठाळ यांचा लीनेन्स क्लबच्या राज्यस्तरीय मेळाव्यात डॉ मंजिरी कुलकर्णी आणि आंबाजोगाई लीनेन्सच्या अध्यक्ष आशा वाघमारे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या प्रसंगी कोषाध्यक्ष आयोध्या गाठाळ, सचिव ललिता पुजारी, कॅबिनेट लेनेस गयाताई कराड, डॉ. नयना सिरसाट तसेच सदस्य सुवर्णा देशमुख, सरोज जाजू, वर्षा देशमुख, इंदू गुट्टे, मंगल गोरे, उषा मोहिते, विजया खोगरे, सरस्वती फड, आशा कराड, माधवी झांबरे, रेवती साखरे ह्या आवर्जून उपस्थित होत्या.

## बदनापूर बसस्थानकात आगारप्रमुख व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी!

**भाऊसाहेब घुगे यांची परिवहन मंत्र्यांकडे मागणी**

जालना । प्रतिनिधी

नव्याने बांधण्यात आलेल्या बदनापूर बस स्थानकात आगार प्रमुख आणि कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून बससेवा सुरू करावी. अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे केली आहे.



मंगळवारी (ता. ११) मंत्रालयात परिवहन मंत्र्यांची भेट घेऊन भाऊसाहेब घुगे यांनी बदनापूर बसस्थानकात आवश्यक सोयी-सुविधा पुरविण्याबाबत सविस्तर चर्चा करून लेखी निवेदन दिले. जालना- छत्रपती संभाजी नगर महामार्गावर तालुक्याचे ठिकाण असलेल्या बदनापूर येथे बस स्थानक उभारणी बाबत अनेक वर्षांपासून रेंगाळत पडलेला प्रश्न उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी सोडवला. आचारसंहितेपूर्वी बस स्थानकाचे लोकार्पणही करण्यात आले. मात्र

अद्यापर्यंत येथे बस सेवा सुरू झाली नाही. शालेय विद्यार्थी तसेच तालुक्यातील जनतेच्या

सुविधांसाठी अगार प्रमुख आणि कर्मचारी नियुक्ती करून येथे बस सेवा सुरू करण्याबाबत संबंधितांना आदेश द्यावेत. अशी आग्रही मागणी भाऊसाहेब घुगे यांनी परिवहन मंत्र्यांकडे केली.

# पोलीस अधीक्षक यांनी आदेश देताच खूनातील आरोपी पकडले

जालना । प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल येणे तपास करण्यासंदर्भात आदेश केल्याने खून प्रकरणी आरोपीला ३६ तासात पकडले.२२ वर्षीय नवयुवकाचा खुन करुन जाळून टाकुन पुरावा नष्ट करणाऱ्या खुण्यांच्या आवळल्या मुसक्या

दि८ फेब्रुवारी रोजी रात्री मौजे मेव्हणा येथील २२ वर्षीय युवक आकाश बबन जाधव हा घरासमोर झोपलेला असतांना अज्ञात इसमाने अज्ञात कारणासाठी खुण करुन गायराणातील शेततळयात अर्धवट जाळुन टाकुन दिले म्हणुन मयताचे वडीलांचे फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन बदनापुर येथे अज्ञाताविरुध्द खुणाचा गुन्हा दाखल होता. गुन्हयातील आरोपी निष्पन्न करण्यासाठी वरीष्ठांकडुन वारंवावर मार्गदर्शन करुन विचारणा सुरु होती. पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी तक्रारकाराला लवकरच तपास करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक यांनी फिर्यादीला दिलेला शब्द पूर्ण केला.

गुन्हयाचे तपासामध्ये अज्ञात आरोपी निष्पन्न करणे हा बदनापुर पोलीसां समोर यक्षप्रश्न निर्माणा झालेला होता. वरीष्ठांच्या मार्गदर्शना खाली स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक पंकज जाधव व पोलीस स्टेशन बदनापुर यांनी संयुक्तीकरित्या मयताचा पूर्वइतीहास व वर्तनाचे विश्लेषण करुन गुन्हयाचा उद्येश निष्पन्न करुन गुन्हयातील आरोपी बालाजी काशिनाथ मिसाळ व गणेश काशिनाथ मिसाळ यांना ताब्यात घेऊन विचारपुस केली असता आरोपीतांनी संगणमत करुन



मयताचे प्रेमसंबंध असावेत अशा संशयावरुन मयत घरा समोर झोपलेला असतांना गायराणातील कोरड्या शेततळयात बोलावुन घेऊन अचानकपणे गळा आवळुन जिवे ठार मारले व पुरावा नष्ट करण्यासाठी स्वतःच्या मोटार सायकल मधील पेट्रोल टाकुन पेटवुन दिले.

अशा अत्यंत क्लिष्ट व गंभीर गुन्हा घडल्यापासुन श्री. अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी, हे पोलीस स्टेशन बदनापुर येथे गुन्हा उघडकीस आणुन आरोपी अटकेपर्यंत तळ ठोकुन होते.

सदरचा गुन्हा अवघ्या ३६ तासात उघडकीस आणुन आरोपी अटक करण्यासाठीची कामगिरी श्री. अजय कुमार बंन्सल, पोलीस अधीक्षक, अपर पोलीस अधीक्षक, अनंत कुलकर्णी, उप विभागीय पोलीस अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. पंकज जाधव, पोलीस निरीक्षक, स्थागुशा, श्री. योगेश उबाळे, सपोनि, स्थागुशा, अविनाश राठोड, सपोनि, श्रीमती स्नेहा करेवाड, सपोनि, श्री. दिलीप चौरे, पोउपनि, श्री. अजय जैस्वाल, सपोउपनि संतोष सावंत, गोविंद डोभाळ, पोहेकॉ सुभाष चव्हाण, नितीन वाघमारे, प्रताप जोनवाल, रंजित मोरे, इस्माईल शेख, पोकॉ तडवी, गोलवाल, पिल्लेवाड, बारवाल, सानप तसेच स्थागुशाचे पोहेकॉ रामप्रसाद पहुरे, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, रुस्तुम जैवाळ, सागर बाविस्कर, इरशाद पटेल, सतिष श्रीवास, सोपान क्षिरसागर, रमेश काळे, सचिन राऊत इत्यादींनी कामगिरी पार पाडली आहे.

# सुवर्णरत्न पुरस्कारांचे शनिवार २२ फेब्रुवारी रोजी वितरण

## शिवकुमार निर्मळे, सुधाकर देशमुख, वर्षाताई मुंडे, विद्याधर पंडित यावर्षीच्या पुरस्कारांचे मानकरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने दरवर्षी दिल्या जाणा-या ''सुवर्णरत्न'' पुरस्कारांचे वितरण यावर्षी शनिवार, दि.२२ फेब्रुवारी २०२५ रोजी करण्यात येणार आहे. यावर्षी हे पुरस्कार शिवकुमार निर्मळे (पत्रकारिता), वृक्षमित्र सुधाकर देशमुख (सामाजिक), वर्षाताई मुंडे (शैक्षणिक) आणि विद्याधर पंडित (कला) यांना जाहिर झाले आहेत. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन संस्थेचे कार्यवाहक प्रा.कैलास भागवत चोले यांनी केले आहे.




येथील संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षीच ''सुवर्णरत्न'' पुरस्कार देवून सन्मानित करण्यात येते. यावर्षी मंगळवार, दिनांक २२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता मुकूंदराज सांस्कृतिक सभागृहात पुरस्कारांचे वितरण व संकल्प विद्या मंदिर शाळेचा सांस्कृतिक कार्यक्रम ही आयोजित करण्यात आलेला आहे. या पुरस्कारांचे वितरण करण्यासाठी डॉ.विठ्ठलराव लहाने (सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जन) हे तर उद्घाटक म्हणून डॉ.नरेंद्र काळे (सचिव, बनेश्वर शिक्षण संस्था) तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संजय गंभीरे (माजी नगरसेवक न.प.अंबाजोगाई) तर प्रमुख अतिथी म्हणून शेख चाँद (गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती अंबाजोगाई), ॲड.राजेंद्रप्रसाद धायगुडे( ज्येष्ठ विधी तज्ज्ञ जिल्हा सत्र न्यायालय अंबाजोगाई) विशाल जाजू (चेअरमन, आर.डी.देशपांडे नागरी सहकारी पतसंस्था), दगडू लोमटे (प्रमुख सुवर्णरत्न पुरस्कार वितरण समिती) हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तसेच ज्येष्ठ पत्रकार शिवकुमार निर्मळे, वृक्षमित्र सुधाकर देशमुख, शिक्षणतज्ज्ञ वर्षाताई मुंडे, प्रख्यात चित्रकार विद्याधर पंडित या मान्यवरांना त्यांनी त्यांच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सुवर्णरत्न पुरस्कार-२०२५ देवून सन्मानित करण्यात येणार आहे. तरी या पुरस्कार वितरण सोहळ्यास व सांस्कृतिक कार्यक्रमास आपण जरूर उपस्थित रहावे असे अवाहन संकल्प विद्या प्रतिष्ठानच्या सचिव प्रा.कैलास भागवत चोले, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती रेखा सुभाष बडे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्रीमती घाडगे प्रिया, श्रीमती अनिता कुलकर्णी व संकल्प परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/१५
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १७/०१/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : श्रीमती दया निळकंठ कुलकर्णी २. अमेय निळकंठ कुलकर्णी सि.स.नं. ९ प्लॉट नं १८-८२-२४ चे वारसा अधारे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. () दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतुःसिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- ओपन स्पेस
पश्चिम : ९ मिटरचा कॉलनीअंतर्गत रोड
दक्षिण- प्लॉट नं. २३
उत्तर : प्लॉट नं. २५

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

पान ६ वरून...

### पालकांनी आपले स्वप्न

स्वप्न अपूर्ण राहिले तर ते स्वप्न पूर्ण करण्याची इच्छा किंवा जवाबदारी आपल्या पाल्यावर लादू नये असे आवाहन देखील भागवत मसने यांनी याप्रसंगी कार्यक्रमास उपस्थित सर्व पालकांना केले. असे केल्याने त्यांची मानसिक कुचंबना होऊ शकते. निसर्ग त्याला घडवतच असतो आपण त्याला त्याच्या गरजेपुरत्या भौतिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व आपल्या पाल्यासोबत मैत्रीपूर्ण व सौदारह्याचे संबंध प्रस्थापित करावेत असेही आव्हान भागवत मसने यांनी केले. या कार्यक्रमाचे आयोजन ज्ञानगंगा गुरुकुल चे संचालक डिगांबर बबनराव सोळंके तर संचालिका सौ. ज्योती डिगांबर सोळंके यांनी केले. कार्यक्रमात उपस्थित सर्व पालकांचा यावेळी सन्मान करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरुकुल विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यां, शिक्षक तसेच शकिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक असे परिश्रम घेतले.

-------------

### घरकुल आवास योजनेसाठी

नगरपंचायतने शासकीय जागा ताब्यात घेऊन त्याचे गरजूंना लागल तेवढेच क्षेत्रफळ आखून प्लॉट्स पाडून द्यावेत. आणि सर्वसामान्य गरीब लोकांना आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याचा साक्षात्कार करून द्यावा. एकंदर शहरी आणि ग्रामीण दोन्ही भागातील सर्वसामान्य लोकांना आपल्या घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी शासकीय जागा उपलब्ध करून देण्याची तसदी शहरात नगरपंचायत आणि ग्रामीण भागात ग्रामपंचायतींनी शासकीय जागा, प्लॉट्स सर्वसामान्य गरीब आणि मागासवर्गीय लोकांना प्रधानमंत्री आवास योजना आणि रमाई आवास योजना याचा लाभ मिळवून द्यावा असे एका निवेदनाद्वारे मुख्याधिकारी नगरपंचायत, तहसीलदार आणि जिल्हाधिकारी यांना आवाहन मनसे जिल्हाध्यक्ष श्रीराम बादाडे आणि जिल्हा सचिव यशवंत उजगरे यांनी केले आहे.

**रमाई योजनेची हिच परस्थिती**

प्रधानमंत्री आवास योजना प्रमाणे रमाई आवास योजनेचा देखील बऱ्याच लोकांना लाभ घेता येत नाही त्याचे कारण असेच आहे. रमाई आवास योजना ही खास करून मागासवर्गीयांसाठी आहे. गरीब लोकांना वडवणी सारख्या ठिकाणी प्लॉट घेणं अवघड असताना मागासवर्गीय लोकांचे तर काही विचारूच नका. त्यांना तर कामही नाही, पैसे नाही, आणि कोणाकडे पैसे असले तरी त्याला लवकर प्लॉट मिळत नाही. अशा अनेक कुटुंबाला रमाई आवास योजनेचा देखील लाभ प्लॉट अभावी घेता येत नाही आणि ते वंचित राहतात त्यामुळे सर्व मागासवर्गीय लोकांना शासकीय जागा उपलब्ध करून देऊन रमाई आवास योजनेचा लाभ घेण्या योग्य करावे आणि त्यांनाही त्यांच्या घराचे स्वप्न पूर्ण करू द्यावे. अशी मागणी देखील केली आहे.

### सोशल मीडियाचा वापर

लागले आहे. पण तो त्या मोबाईलवर काय पाहतो ? चांगले पाहतो की वाईट? हे पाहण्याची जबाबदारी पालकांची आहे . शिक्षक विद्यार्थ्यांचे नाते शाळेच्या वेळेत असते,शिक्षक विद्यार्थ्यावर प्रबोधनाचे डोस देऊन त्याला शहाणे करण्याचा प्रयत्न करत असतात.ही बाब असली तरी अनेक पालकांकडे आपल्या पाल्यासाठी द्यायला वेळ नसतो ही गोष्ट तितकीच चिंतेची आहे. पालकांनी आपल्या पाल्यावर करडी नजर ठेवून त्याला मोबाईल मधून वाईट गोष्टी मिळणार नाहीत याकडे प्राधान्याने लक्ष देण्याची गरज आहे.असे सांगून ते म्हणाले की जीवनामध्ये शिक्षण प्रत्येक गोष्टीसाठी महत्त्वाचे आहे चांगले शिक्षण आपल्याला नोकरी मिळवून देते पैसा मिळवून देते पण त्याचबरोबर चांगले शिक्षण हे माणूस म्हणून जगायला शिकवते तेव्हा विद्यार्थ्यांनी पुस्तकी ज्ञानापेक्षा इतर उपक्रमात भाग घेऊन सर्व प्रकारचे ज्ञान आत्मसात केले पाहिजे तरच असे विद्यार्थी भविष्यातील स्पर्धेच्या युगात तग धरू शकतील आणि प्रगती करू शकतील.तेव्हा विद्यार्थ्यांनी ज्ञान संपादन करत असताना जे चांगले आहे ते संपादित करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही ते शेवटी म्हणाले. कवी मोहन राठोड यांनी विद्यार्थ्यां समोर काही कविता सादर केल्या.या कवितांना विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली.रामेश्वर कासट यांनी राजस्थानी विद्यालय करत असलेल्या उपक्रमाचे आणि त्यांच्या प्रगतीचे आपल्या मार्गदर्शनपर भाषणामध्ये कौतुक केले आणि विद्यार्थ्यांशी मोकळा संवाद साधला. यानंतर राजस्थानी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्यातील कलागुण सादर केले.

### सोयाबीन प्रश्नांवर महाविकास

या आंदोलनात खासदार सुप्रिया सुळे, ओमराजे निंबाळकर, निलेश लंके, प्रणिती शिंदे, वर्षा गायकवाड, विशाल पाटील, प्रतिभा धानोरकर, जालन्याचे खासदार कल्याण काळे, प्रशांत पडोळे, बळवंत वानखेडे आणि शिवाजी काळगे यांनी सहभाग घेतला. खासदारांनी सरकारला इशारा दिला की, शेतकऱ्यांच्या मागण्या तातडीने मान्य करून सोयाबीन खरेदीला मुदतवाढ द्यावी आणि शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

### रस्ता कामातील

बांधकाम विभाग मंत्रालय मुंबई २. अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग धाराशिव ३. उपअधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग औरंगाबाद ४. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड ५. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग आष्टी जि. बीड ६. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग पाटोदा जि. बीड ७. उप अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग शिरूर का. जि. बीड यांना नोटीस काढल्या असून याचिकेची पुढील सुनावणी दि. ०३.०३.२०२५ रोजी ठेवली आहे. याचिकाकर्त्याच्या वतीने ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पहिले तर त्यांना ॲड. राकेश ब्राम्हणकर ॲड. सोनाली गणेश सोमवंशी ॲड. गौरव शिवाजी खांडे ॲड. रवींद्र बी. वानखेडे यांनी सहकार्य केले तर शासनाच्या वतीने ॲड. एस. आर. वाकळे यांनी काम पहिले.


### मौंजवाडीतील शेतकऱ्यांना

श्री ए.डी. काळे, कृषी सहाय्यक के. बी. शिंदे, व एस एल शेळके उपस्थित होते. तुळजाभवानी शेतकरी बचत गट मोजवाडी गटाचे अध्यक्ष श्री शिवाजी मुळेकर, सचिव श्री रामदास कासकर व सर्व सदस्य उपस्थित होते. या प्रशिक्षणाची सुरुवात आलेल्या सर्व पाहुण्यांचे स्वागत करून करण्यात आली, तसेच उपस्थित सर्व शेतकऱ्यांना प्रशिक्षण साहित्य वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री एस एल शेळके यांनी केले. आत्मा विभागाच्या विविध योजनांची माहिती श्री काळे सर यांनी दिली. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक श्री पोकळे सर यांनी उपस्थित सर्व शेतकरी वर्गास सेंद्रिय शेतीचे महत्व व काळाची गरज पटवून दिली. यामध्ये शेणखत, गांडूळ खत,दशपर्णी अर्क, जीवामृत इत्यादी घटक कसे तयार करावयाचे व त्यांचा वापर शेतीमध्ये कसा करावयाचा याचे सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. श्री गोसावी सर यांनी आपल्या मार्गदर्शनात शेतीचा आर्थिक ताळेबंद समजून सांगितला. तसेच आपल्या धार्मिक वक्तृत्व शैलीतून अनेक शेती समर्पक उदाहरणे देऊन सेंद्रिय शेतीचे महत्व पटवून दिले. त्याबरोबरच रासायनिक घटकांच्या अतिवापरामुळे होत असलेल्या दुष्परिणामावर प्रकाश टाकला. यानंतर गटातील सदस्य व प्रगतशील शेतकरी श्री अशोक जाधव यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी व शेतकरी वर्गास चहा अल्पोपहार देऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन गटाचे अध्यक्ष श्री शिवाजी मुळेकर यांनी केले.

# वसंतदादा कारखाना निवडणूकीसाठी २१ जागांकरिता १४४ अर्ज दाखल

सांगली : वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखाना निवडणुकीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत २१ जागांसाठी १४४ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. ११ ते २५ दरम्यान उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. आवश्यकता भासल्यास ९ मार्चला मतदान होणार आहे.

अर्ज दाखल केलेल्या प्रमुख उमेदवारांमध्ये व्यक्ती उत्पादक गटातून विद्यमान अध्यक्ष खासदार विशाल पाटील, हर्षवर्धन पाटील, उदयसिंह कदम, दिनकर साळुंखे, राजेश एडके, प्रदीप मगदूम, प्रवीण पाटील, बजरंग पाटील यांनी अर्ज दाखल केले आहेत. वसंतदादा साखर कारखाना सध्या १० वर्षे मुदतीसाठी दत्त इंडिया कंपनीस चालविण्यास दिला आहे. सध्याचा आठवा हंगाम ते घेत आहेत. तेव्हा कारखाना निवडणूक लागणार की बिनविरोध



होणार, यावर २५ तारखेला शिक्कामोर्तब होणार आहे. वसंतदादा कारखान्याच्या २१ संचालक पदांसाठी निवडणूक होत आहे. कारखान्याचे ३६ हजार मतदार आहेत. यामध्ये सांगली, मिरज, आष्टा, भिलवडी, तासगाव या पाच गटांमधून प्रत्येकी ३ असे १५, उत्पादक सहकारी संस्था, बिगर उत्पादक सहकारी संस्था व पणन संस्था सभासद मतदार संघ क्रमांक २, तसेच अनुसूचित जाती किंवा जमाती मागासवर्गीय १, भटक्या-विमुक्त जाती व जमाती, विशेष मागास प्रवर्गामधून १ असे २१ संचालक निवडून द्यायचे आहेत. सध्या हा कारखाना 'दत्त इंडिया'कडे चालविण्यासाठी दिलेला आहे.

### निवडणूक प्रक्रिया अशी...

अर्जांची छाननी -१० फेब्रुवारी, वैध अर्ज प्रसिद्धी -११ फेब्रुवारी, अर्ज माघार- ११ ते २५ फेब्रुवारी, उमेदवारांची अंतिम यादी -२७ फेब्रुवारी, आवश्यक भासल्यास मतदान- ९ मार्च.




### महत्वाच्या घटना

१५०२ : लिस्बन, पोर्तुगाल येथून वास्को-द-गामा भारताच्या दुसर्या सफरीवर निघाला.
१६८९ : आजच्या दिवशी विल्यम आणि मेरी हे इंग्लंड चे राजा राणी बनले.
१९२२ : महात्मा गांधीनी असहयोग आंदोलन वापस घ्यायची घोषणा केली.
१९२८ : गुजरात च्या बारदोली येथे महात्मा गांधी यांनी सत्याग्रह करण्याची घोषणा केली.
१९७६ : पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांच्या हस्ते हडेक्की (केरळ) प्रकल्प देशास अर्पण.
१९९३ : एम. एन. वेंकटचलैय्या यांनी भारताचे २५ वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.
१९९४ : दोन व्यक्तींनी नॅशनल गॅलरी फोडून त्यातून एडवर्ड मुंक यांची प्रसिद्ध पेंटिंग ''द स्क्रीन'' आजच्या दिवशी चोरी झाली.
१९९९ : बिहार येथे २५ दिवसांसाठी राष्ट्रपती शासन लागू झाले होते.
२००३ : आवाजापेक्षा दुप्पट वेगवान ब्राह्मोस क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेण्यात आली.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७४२ : बाळाजी जनार्दन भानू उर्फ 'नाना फडणवीस' पेशव्यांच्या दरबारी असणारे मराठा साम्राज्यातील मुत्सद्दी,
१८०४ : हेन्रिक लेन्झ जर्मन भौतिकशास्त्रज (मृत्यू: १० फेब्रुवारी १८६५)
१८०९ : अब्राहम लिंकन अमेरिकेचे १६ वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: १५ एप्रिल १८६५)
१८०९ : चार्ल्स डार्विन उत्क्रांतीवादाचा सिद्धांत मांडणारे ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ (मृत्यू: १९ एप्रिल १८८२)
१८२४ : मूळशंकर करसनदास तिवारी तथा स्वामी दयानंद सरस्वती संस्कृत विद्वान आणि आर्य समाजाचे संस्थापक (मृत्यू: ३१ आक्टोबर १८८३ अजमेर, राजस्थान)
१८७१ : चार्लस फ्रिअरी तथा दीनबंधू अॅन्ड्र्यूज इंग्लिश मिशनरी, महात्मा गांधींचे जवळचे मित्र, समाजसेवक आणि भारताच्या स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते (मृत्यू: ५ एप्रिल १९४०)
१८७६ : थुब्तेन ग्यात्सो १३ वे दलाई लामा (मृत्यू: १७ डिसेंबर १९३३)
१८७७ : फ्रेंच व्यापारी रेनॉल्ट कंपनीचे संस्थापक लुई रेनॉल्ट यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर १९४४)
१८८१ : अॅना पाव्हलोव्हा 'द डाइंग स्वान' म्हणून प्रसिद्ध असलेली रशियन बॅलेरिना (मृत्यू: २३ जानेवारी १९३१)
१९२० : प्राण कृष्ण सिकंद ऊर्फ 'प्राण' चित्रपट अभिनेता (मृत्यू: १२ जुलै २०१३)
१९४९ : गुन्डाप्पा विश्वनाथ शैलीदार फलंदाज
१९५४ : लोकसभेचे माजी सदस्य कीर्ती सोम्या यांचा जन्म.
१९६७ : प्रसिद्ध गायक चित्रवीणा एन रविकिरण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९४ : पेशवाईतील मुत्सद्दी महादजी शिंदे यांचे वानवडी येथे निधन (जन्म: १७३०)
१८०४ : एमॅन्युएल कांट जर्मन तत्त्ववेत्ता (जन्म: २२ एप्रिल १७२४)
१९१९ : दक्षिण भारतातील नवाब सैयद मोहम्मद बहादुर यांचे निधन.
१९८१ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक शांताराम आठवले यांचे निधन.
१९९८ : पद्मा गोळे कवयित्री (जन्म: १० जुलै १९१३)
२००० : विष्णुअण्णा पाटील सहकार क्षेत्रातील नामवंत नेते (जन्म:)
२००१ : भक्ती बर्वे अभिनेत्री (जन्म: १० सप्टेंबर १९४८)

## घरच्या घरी तपासा बियाण्याची उगवण क्षमता



शेतकऱ्यांचा असा समज असतो की, प्रत्येक वर्षी नवीन बियाणे खरेदी करुनच पेरणी करावी. परंतु सोयाबिन, मुग, उडीद, चवळी, हरभरा भूईमुग, गहू या पिकांमध्ये स्वपरागसिंचन होत असल्यामुळे कोणतेही संकरित वाण या पिकांमध्ये उपलब्ध नाही. त्यामुळे सरळ वाणाचे बियाणे विकत घेतल्यानंतर त्यापासून तयार होणारी बियाणे आपण पुढील दोन वर्ष बियाणे म्हणून वापरु शकतो. त्यामुळे दरवर्षी बियाणे खरेदी करण्याची आवश्यकता नाही. घरगुती बियाण्याची पेरणी करताना त्याची बियाण्याची उगवण चाचणी महत्त्वाची आहे. अन्यथा संपूर्ण पेरणी वाया जावू शकते. त्यामुळे घरगुती बियाण्याची उगवण चाचणी करणे महत्वाचे आहे.

गोणपाट वापरुन उगवण क्षमता तपासणी : गोणपाट पध्दतीमध्ये बियाणांचा प्रत्येक पोत्यातून खोलवर हात घालून मुठभर धान्य बाहेर काढावे. यानंतर सर्व पोत्यातून काढलेले धान्य एकत्र करुन घ्यावे. गोणपाटाचे सहा चौकोनी तुकडे घेऊन स्वच्छ धुऊन घ्या. एक तुकडा जमिनीवर पसरवा. पोत्यातून काढलेल्या धान्यातून सरसकट शंभर दाणे मोजून दीड ते दोन से.मी. अंतरावर दहा-दहाच्या रांगेत गोणपाटाच्या एका तुकड्यावर ओळीत ठेवावे. अशा प्रकारे शंभर दाण्यांचे तीन नमुने तयार करावे. गोणपाटावर पाणी शिंपडून ओले करावे. बियाणांवर दुसऱ्या गोणपाटाचा तुकडा अंथरुन पुन्हा पाणी शिंपडावे. गोणपाटांच्या तुकड्यांची बियाणांसकट गुंडाळी करुन थंड ठिकाणी सावलीत ठेवावे. त्यावर अधून-मधून पाणी शिंपडून ओले ठेवावे. यानंतर सहा-सात दिवसानंतर ही गुंडाळी जमिनीवर पसरुन उघडावी. चांगले कोंब आलेले दाणे वेगळे करून मोजा. तीनही गुंडाळ्यांची सरासरी काढून शंभरपैकी सत्तर किंवा त्यापेक्षा जास्त दाणे जर कोंब आलेले असतील तर बियाणे बाजारातील बियाणांसारखे गुणवत्तेचे आहेत, असे समजता येईल. परंतु जर उगवण झालेल्या बियाणांची सरासरी संख्या सत्तरपेक्षा कमी असेल तर एकरी बियाणांचे प्रमाण वाढवून पेरणी करावी. तसेच पेरणी करताना बियाण्यास बुरशीनाशक व जिवाणू संवर्धकांची प्रक्रिया करणे आवश्यक आहे.

वर्तमानपत्राचा कागद वापरुन उगवण क्षमता तपासणी : वर्तमानपत्राचा एक कागद घेऊन त्याच्या चार घड्या पाडाव्यात. यामुळे कागदाची जाडी वाढेल. नंतर तो कागद पाण्याने ओला करावा. प्रत्येकी दहा बिया घेऊन त्या एका रांगेत समान अंतर सोडून वर्तमानपत्राच्या टोकाच्या भागावर ठेवून त्याची गुंडाळी करावी. अशा पध्दतीने शंभर बियांच्या दहा गुंडाळ्या तयार कराव्यात. त्या गुंडाळ्या पॉलिथीन पिशवीत चार दिवस तशाच ठेवाव्यात. चार दिवसानंतर त्यामधील अंकुर मोजावेत.

पाण्यात भिजवून उगवण क्षमता तपासणी : बियाणांच्या प्रत्येक पोत्यातून खोलवर हात घालून मुठभर धान्य बाहेर काढावे. सर्व पोत्यातून काढलेले धान्य एकत्र करुन घ्यावे. त्या नमुन्यात शंभर दाणे मोजून वेगळे काढा. असे शंभर दाण्यांचे तीन संच तयार करावे. शक्यतोवर काचेच्या तीन पेल्यात पाणी घेऊन त्यात हे दाणे टाकावे. पाच ते सहा मिनीट ते तसेच राहू द्यावे. त्यानंतर पाणी फेकून देऊन दाणे वेगळे काढा व त्यामधील पूर्णत: फुगलेले तसेच बियाण्यांच्या टरफलावर सुरकुत्या पडलेले दाणे वेगळे करावे. यामध्ये दोन्ही प्रकारच्या दाण्यांची संख्या मोजून घ्यावी. जो दाणा पाच ते सहा मिनिट पाण्यात ठेवल्यावर फुगतो तो पेरणीसाठी अयोग्य समजावा. मात्र जे बियाणे चांगले असते त्याचे टरफल शाबूत असल्यामुळे त्यात पाणी आत शिरत नाही. फक्त टरफलातून पाणी आत गेल्यामुळे त्यावर सुरुकुत्या पडल्यासारख्या दिसतात. यामुळे शंभर दाण्यापैकी जरी सरासरी सत्तर किंवा जास्त दाणे अशा प्रकारे न फुगलेले, सुरकुत्या न पडलेले असेल तर बियाणे बाजारातील बियाण्यांसारखे गुणवत्तेचे आहेत, असे समजावे. शेतकऱ्यांनी स्वत:कडील बियाणे वापरण्यापूर्वी त्याची उगवण क्षमता तपासल्यानंतरच बियाण्यांची पेरणी करावी. उगवण क्षमता सत्तरपेक्षा कमी असल्यास त्या प्रमाणात अधिकचे बियाणे पेरणीसाठी वापरावे. अशा पध्दतीने उगवण क्षमता तपासणी केल्यानंतर बियाणे पेरल्यास शेतकऱ्याचे वेळ आणि श्रम दोन्ही वाचेल.

## डाळिंब तडकण्याची कारणे आणि उपाययोजना

महाराष्ट्रात डाळिंबाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. मात्र सध्याचे बदलते हवामान आणि इतर कारणांमुळे डाळिंब उत्पादक शेतकऱ्यांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. डाळिंब बागेचे नियोजन करताना जमिनीची योग्य निवड केल्यास व माती परीक्षण याप्रमाणे संतुलित खतांचा वापर आणि बागेत स्वच्छता ठेवल्यास बागेचे उत्पादित आयुष्य वाढविता येते. मागील काही वर्षापासून पक्व होणाऱ्या डाळिंब फळावर तेलकट चट्टे आणि फळे तडकण्याची विकृती मोठ्या प्रमाणावर आढळून येत आहे. जवळजवळ १५ ते २० टक्के नुकसान हे फळे तडकण्याने होते.

फळे तडकण्याची कारणे : फळत तडकण्यास अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्यामध्ये चुकीचे पाणी व्यवस्थापन, जमिनीची निवड, हवामानातील बदल व तेलकट डाग रोगाचा प्रादुर्भाव. अतिशय हलक्या जमिनीत नांगरटीच्या तासात रोपांची लागवड. जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण १२ टक्के पेक्षा जास्त असणे. जमिनीमध्ये नत्र, स्फुरद या मुख्य अन्नद्रव्य बरोबर कॅल्शियम व मॅग्नेशियम या दुय्यम अन्नद्रव्याची कमतरता तसेच बोरॉन या सूक्ष्म अन्नद्रव्याची कमतरता असणे. हवेतील तापमान व आद्रतेत विशेषतः रात्र व दिवसातील तापमानात होणारी तफावत. अवर्षणाचा सारखी परिस्थिती जास्त कालावधीसाठी राहिल्यास फळांची साल कडक होते अशा परिस्थितीत एकाएकी पाऊस पडल्यास किंवा भरपूर पाणी दिल्यास फळांच्या तडकण्याच्या प्रमाणात वाढ होते.

उपाययोजना : डाळींबासाठी मध्यम, निचऱ्याची जमीन निवडावी. २२२ फूट लांबी रुंदी खोलीचे खड्डे घेऊन त्यामध्ये माती अधिक दोन घमेले कुजलेले शेणखत+१/२ किलो सुपर फॉस्फेट+ ५० ग्रॅम फोरेट यांचे मिश्रण करून खड्डे भरूनरोपांची लागवड करावी. माती



परीक्षणासाठी प्रातिनिधिक स्वरूपाचा खड्डा घेऊन प्रत्येक पहिल्या फुटातील मातीचा पहिला थर, दुसरा थर आणि तिसऱ्या पोटात माती असल्यास तिसरा तर अशा थराप्रमाणे माती घेऊन त्याचे प्रयोगशाळेत तपासणी करून घ्यावी. माती परीक्षण अहवालाप्रमाणे सामू हा ६.५ ते ८.० पर्यंत आला असावा. विद्युत वाहकता ही ०.५० डेसी सायमन प्रति मीटरपेक्षा कमी असावी तसेच मुक्त चुनखडीचे प्रमाण सर्व थरात बारा टक्के पेक्षा कमी असावे. माती परीक्षणावरून डाळिंबास शिफारस केल्याप्रमाणे पूर्ण वाढलेल्या झाडाच्या शेणखत चार ते पाच घमेले तसेच ६२५ ग्रॅम नत्र, २५० ग्रॅम स्फुरद आणि २५० ग्रॅम पालाश प्रति वर्ष प्रति झाडास ताण संपल्यानंतर पहिले पाणी देण्यापूर्वी द्यावेव उर्वरित नत्राची मात्रा दोन समान हप्त्यांत विभागून द्यावे. पहिली मात्रा ताण संपल्यानंतर बेसल डोस च्या वेळी व उर्वरित मात्रा १२ नंतर ४५ दिवसांनी आळे पद्धतीने द्यावी. जमिनीत मुक्त चुनखडीचे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षा कमी असल्यास स्फुरद हे सिंगल सुपर फॉस्फेट द्वारे द्यावे. म्हणजे या खताद्वारे स्फुरद व्यतिरिक्त कॅल्शियमचा पुरवठा झाडांना होतो तसेच मॅग्नेशियम सल्फेट चा वापर प्रति झाड २५ ग्रॅम प्रमाणे करावा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्य स्लरी द्वारे उदा. एकरी २०० लिटर पाण्यामध्ये २५ किलो ताजे शेण+ पाच लिटर गोमूत्र+ पाच किलो फेरस सल्फेट+ पाच किलो झिंक सल्फेट + दोन किलो बोरिक ॲसिड एकत्र आठवडाभर मुरवून सातव्या दिवशी झाडांनाच स्लरी द्यावी. फुले येण्यापूर्वी व ५० टक्के फुले असताना झाडावर फुले मायक्रो ग्रेड २या द्रवरूप सूक्ष्म अन्नद्रव्य ग्रेड ची फवारणी करावी. बागेत आच्छादनाचा वापर केल्यास तापमान व आद्रते वर नियंत्रण राहते. जमिनीच्या पोटात यानुसारच पाण्याचे नियोजन करावे.शक्यतो ठिबक सिंचनाद्वारे विद्राव्य खतांचा वापर करावा व पाण्याचे नियंत्रित वापर करावा. डाळिंब जास्त पाण्याचा वापर करू नये काळ्या जमिनीत निचऱ्याची व्यवस्था करावी. तांबड्या व हलक्या जमिनीत कॅल्शियमचे प्रमाण कमी असल्यास बोरॉन ची फवारणी फुले आल्यावर व फळे लिंबाच्या आकाराची असताना करावी तसेच -ड्रीपद्वारे दोन किलो कॅल्शियम नायट्रेट दोनशे लिटर पाण्यातून एकरी फळ फुगवण याच्या काळात सोडावे. फळांची फुगवण तसेच रंग आणि चव चांगली येण्यासाठी फळ पक्वतेच्या काळात पोटॅशियम शोनाइट दोन किलो+ दोनशे लिटर पाण्यातून ठिबक द्वारे किंवा फवारणीद्वारे १५ दिवसांच्या अंतरानेदोन ते तीन वेळा द्यावे.

## जाणून घ्या उन्हाळी तीळ लागवड तंत्रज्ञान

तीळ हे प्राचीन काळापासूनचे महत्त्वाचे तेलबिया पीक आहे. तीळ हे पीक ८५ ते ९० दिवसात येत असल्याने खरीप हंगामासोबत उन्हाळ्यातही तीळ पिकाची लागवड केली जात आहे. खरीप हंगामात मॉन्सूनच्या लहरीपणामुळे नुकसान होत असल्याने उन्हाळी हंगामातील तीळ लागवडीस प्राधान्य दिले जात आहे. उन्हाळी हंगामामध्ये पाण्याची हमखास सुविधा असलेल्या ठिकाणी तीळ लागवड फायदेशीर ठरते. सुधारित वाण आणि लागवड तंत्राचा अवलंब केल्यास उत्पादन चांगले मिळते.

हवामान :तीळ हे अत्यंत नाजूक व संवेदनशील पीक आहे. तापमान, सूर्यप्रकाश आणि वातावरणातील आर्द्रता यांचा पीक वाढीवर परिणाम होतो. उगवणीनंतर किमान तापमान १५ अंश सेल्सिअस, कायिक वाढीसाठी २१ ते २६ अंश सेल्सिअस, तर फुलधारणा अवस्थेत २६ ते ३२ अंश सेल्सिअस तापमान आवश्यक आहे. तापमान ४० अंश सेल्सिअसच्या वर गेल्यास फुलगळ होते. वाणानुसार फुल धारणेची सुरुवात होते. पीक प्रकाशाच्या कालावधीला संवेदनशील आहे. प्रकाशाचा कालावधी जास्त असल्यास बियाण्यातील तेलाचे प्रमाण वाढते, तर प्रथिनांचे कमी होते.जमीन : मध्यम ते भारी व उत्तम पाण्याचा निचरा होणारी जमीन लागवडीस निवडावी. वालुकामय पोयट्याच्या जमिनीत पुरेसा ओलावा असल्यास हे पीक चांगले येते. जमिनीचा सामू ५.५ ते ८.० इतका असावा.

पूर्वमशागत : तिळाचे बी आकाराने लहान असते. तसेच पिकाची सुरुवातीची वाढ ही हळू होते. त्यामुळे जमीन चांगली भुसभुशीत करून घट्ट दाबून घ्यावी. खोल नांगरट केल्यानंतर कुळवी करून जमीन भुसभुशीत करावी किंवा रोटाव्हेटरच्या साह्याने जमीन तयार करावी.



पेरणीपूर्वी जमिनीवर लाकडी फळी फिरवून जमीन दाबून सपाट करून घ्यावी. उगवण चांगली होण्यास मदत मिळते.

सुधारित वाण : तीळ हे पीक हवामानातील विविध घटकांस अतिशय संवेदनशील असल्यामुळे विभाग व हंगामनिहाय शिफारशीत वाणांची पेरणीसाठी निवड करावी. उन्हाळी तिळासाठी फुले पूर्णा, ए.के.टी.- १०१ या वाणांची लागवड करावी.

पेरणी कालावधी : उन्हाळी तीळ पिकाची पेरणी १५ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करावी. पेरणी शक्यतो बैल पाभरीने करावी. पाभरीने पेरणी करताना बियाणांमध्ये बारीक वाळू किंवा चाळून घेतलेले शेणखत मिसळावे. पेरणी ३० बाय १५ सें.मी. किंवा ४५ बाय १० सें.मी. अंतरावर करावी. पेरणी करताना बियाणे २.५ सें.मी. पेक्षा जास्त खोलीवर पडणार नाही याची काळजी घ्यावी. बियाणे जास्त खोलवर पडल्यास त्याचा उगवणीवर परिणाम होतो.

विरळणी : पेरणीनंतर तीन आठवड्यांच्या आत विरळणी करावी. पिकाच्या योग्य वाढीसाठी व अधिक उत्पादन मिळविण्यासाठी रोपांची संख्या २.२२ लाख प्रति हेक्टर इतकी ठेवावी. त्यासाठी ४५ सें.मी. अंतरावर पेरणी केलेली असेल, तर दोन रोपांत १० सें.मी. अंतर ठेवून विरळणी करावी. पेरणी ३० सें.मी. अंतरावर केली असल्यास, दोन रोपांतील अंतर १५ सें.मी. इतके ठेवून विरळणी करावी.

खत व्यवस्थापन : शेवटच्या कुळवणी अगोदर चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ ते ६ टन प्रमाणे जमिनीत मिसळावे. किंवा हेक्टरी एक टन निंबोळी पेंड पेरणीबरोबर द्यावे. तीळ पिकास नत्र ५० किलो प्रति हेक्टर देण्याची शिफारस आहे. त्यापैकी नत्राची अर्धी मात्रा म्हणजेच २५ किलो नत्र पेरणीवेळी, तर उर्वरित अर्धी मात्रा पेरणीनंतर २१ दिवसांनी द्यावी. नत्राची दुसरी मात्रा दिल्यानंतर पिकास पाणी द्यावे. हेक्टरी २५ किलो स्फुरदाची मात्रा द्यावी. जमिनीत सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास, पेरणीच्या वेळी हेक्टरी २० किलो गंधक किंवा झिंक द्यावे.अधिक उत्पादनासाठी पीक फुलोऱ्यात आणि बोंडे वाढीच्या अवस्थेत असताना, युरिया (२ टक्के) म्हणजेच युरिया २० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी.

आंतरमशागत : तिळाचे पीक सुरुवातीला फार हळू वाढते. रोपावस्थेत हे पीक अत्यंत नाजूक असून पिकाबरोबर वाढणाऱ्या तणांबरोबर पाणी, अन्नद्रव्यांसाठी स्पर्धाक्षम असते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात तण नियंत्रण करणे आवश्यक आहे. त्यासाठी पेरणीनंतर १५ ते २० दिवसांनी पहिली कोळपणी व निंदणी करावी. तर ३० ते ३५ दिवसांनी दुसरी कोळपणी करावी. गरजेनुसार निंदणी करून पीक तणविरहित ठेवावे.

पाणी व्यवस्थापन : तीळ पीक पाण्यासाठी फारच संवेदनशील आहे. तिळाचे पीक हे पाण्याचा ताण सहन करणारे असले तरी उन्हाळी हंगामात पाण्याचा ताण पडू देऊ नये. पीक उगवणीसाठी जमिनीत पुरेशी ओल असणे आवश्यक आहे. जमिनीच्या मगदुराप्रमाणे १२ ते १५ दिवसांच्या अंतराने पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. पिकास फुले येण्याच्या तसेच बोंडे धरण्याच्या वेळेस पाण्याचा ताण पडू देऊ नये.

# शासकीय आधारभूत खरेदी केंद्र तात्काळ सुरू करा - राजेभाऊ फड

## शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाने खरेदी करण्याची मागणी

परळी। प्रतिनिधी

परळी वैजनाथ तालुक्यातील शासकीय आधारभूत खरेदी केंद्र बंद पडल्याने सोयाबीन उत्पादक शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. शेतकऱ्यांना हमीभाव मिळावा यासाठी सरकारने तातडीने खरेदी केंद्रे सुरू करावी, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी दिला आहे. परळी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचे उत्पादन होते.

मात्र, यंदा खरेदी केंद्र वेळेवर न उघडल्याने शेतकऱ्यांना हमीभावाऐवजी बाजारात कमी दर मिळत आहे. परिणामी, त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. नाफेड कडे नोंदणी केलेल्या सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांपैकी केवळ ५०% शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी करण्यात आली आहे. अजूनही नोंदणीकृत शेतकरी प्रतीक्षेत असून वाहनांच्या लांबच लांब रांगा खरेदी केंद्राबाहेर लागल्या आहेत.

### शेतकऱ्यांवर सुलतानी संकट!

बीड जिल्ह्यात नाफेडचे ३० सोयाबीन खरेदी केंद्र आहेत. या खरेदी केंद्राच्या माध्यमातून अर्ध्या शेतकऱ्यांचे देखील सोयाबीन खरेदी करण्यात आले नाही. एकूण ४४७४४ शेतकऱ्यांनी नाफेडकडे नोंदणी केली होती, परंतु झालेल्या खरेदीतही बारदाना, कडता, हमालीच्या नावावर शेतकऱ्यांची लूट केली जात आहे. नोंदणी झालेल्यांपैकी ५०% शेतकरी अजूनही प्रतीक्षेत असून, केंद्राबाहेर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. अगोदरच अस्मानी संकटाने त्रस्त झालेला बळीराजा आता या सुलतानी सरकारच्या तुघलकी कारभाराने संकटात सापडला असल्याचा घणाघात राजेभाऊ फड यांनी केला असून, शेतकऱ्यांसाठी आपण संघर्षाची तयारी ठेवल्याचे म्हटले आहे.

परळी वैजनाथ तालुक्यात एकूण तीन शासकीय हमीभाव केंद्र असून ती एकतर वेळेवर सुरू झाले नाहीत, सुरू करण्यात आले तरी अल्प कालावधीसाठी सुरू ठेवण्यात आले होते. शेतकऱ्यांची लाखो टन सोयाबीन अद्यापही घरी पडून आहे. शासकीय हमीभाव केंद्र बंद करण्यात आले असल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड आक्रमक झाले आहेत.

शासन आणि प्रशासनाला इशारा देत त्यांनी म्हटले आहे की, शेतकऱ्यांना हमीभाव मिळण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलली पाहिजेत. शासकीय हमीभाव



केंद्रामार्फत सुरू असलेली खरेदी का बंद करण्यात आली? असा सवाल त्यांनी विचारत खरेदी केंद्र तातडीने सुरू करण्यात यावीत अशी मागणी केली आहे. हमीभाव केंद्र सुरू करण्यास उशीर झाल्यास हजारो शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल आणि त्याचा फटका ग्रामीण अर्थव्यवस्थेला बसू शकतो. सरकारने या गंभीर परिस्थितीकडे त्वरित लक्ष द्यावे, अन्यथा आम्हाला रस्त्यावर उतरावे लागेल. आम्ही केलेल्या मागणीची तत्काळ दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना सोबत घेऊन पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

## वसंतदादा पाटील महाविद्यालयात प्रयोजनमूलक हिंदी प्रमाणपत्र कोर्स



पाटोदा। प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महविद्यालयातील हिंदी विभागाच्या वतीने 'प्रयोजनमूलक हिंदी' हा विद्यार्थ्यांसाठी प्रमाणपत्र कोर्स यशस्वीपणे संपन्न झाला. या प्रमाणपत्र कोर्स मध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे व मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरव करण्यात आला.

प्राचार्य हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागाच्या वतीने प्रत्येक शैक्षणिक वर्षात कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील विद्यार्थांसाठी 'प्रयोजनमूलक हिंदी' प्रमाणपत्र कोर्स घेण्यात येतो. एक महिना कालावधी असलेल्या या कोर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सरकारी कार्यालयात हिंदी भाषेचा होत असलेला वापर, कार्यालयीन हिंदी, हिंदी भाषेतील व्यावहारिक शब्द, आधुनिक तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इंग्रजी भाषेतील शब्दासाठी हिंदी भाषेतील शब्दांचा होत असलेला वापर, रोजगारातील संधी,संभाषण कौशल्य विकास या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. 'प्रयोजनमूलक हिंदी' या कोर्स मध्ये अंजली झरे, सुषमा घरत, स्वप्नील वाणी,साक्षी खामकर, विकास भंडारे,अरीबा सय्यद,ऋषिकेश पवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या विद्यार्थ्यांना हिंदी विभाग प्रमुख डॉ.न.पु.काळे, डॉ. दिलीप गिऱ्हे, प्रा.रवींद्र शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

नुकत्याच संपन्न झालेल्या बारावी वर्गाच्या विद्यार्थांसाठी आयोजित निरोप समारंभ कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे, प्रमुख अतिथी ह.भ.प प्रियंकाताई अडसूळ, माजी नगर सेवक संदीप जाधव, उपप्राचार्य डॉ.सतीश माउलगे, कमवि उपप्राचार्य प्रा.नामदेव चांगण,पर्यवेक्षक प्रा.अनिल जोगदंड यांच्या हस्ते प्रमाणपत्राचे प्रातिनिधिक स्वरुपात वितरण करण्यात आले.

## कंत्राटदार अभियंता आणि नगरपालिका प्रशासनाने लाजा सोडल्या

### कोट्यावधी रूपयांच्या सिमेंट रस्त्यांना डांबरी मलब्याचे ठीगळ डॉ.गणेश ढवळे



बीड। प्रतिनिधी

बीड शहरातील नगरोत्थान योजनेंतर्गत कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या सिमेंट रस्त्यापैकी काही कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आली आहेत. बीड शहरातील माने कॉम्प्लेक्स ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह दरम्यान वर्षभरापूर्वी तयार करण्यात आलेल्या नवीन सिमेंट रस्त्यावर तडे आणि मोठा खड्डा पडला असून या ठिकाणी विविध व्यवसायिक दुकाने, शाळांचे क्लासेस ,दवाखाने याच रस्त्यावर आहेत त्यामुळे याठिकाणी नागरिकांची मोठ्या वर्दळ असते. परंतु या रस्त्याच्या मधोमध मोठा खड्डा पडलेला आहे. या खड्ड्यात वाहनांचे चाक अडकून वाहन घसरून अनेक जणांचा अपघात झाला आहे. याबाबत नागरिकांनी नगर परिषद प्रशासनाला वेळोवेळी तक्रारी केल्या आहेत .याकडे नगरपरिषद प्रशासनाकडून दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे नाईलाजाने चाणक्यपुरी , विद्यानगर,माने कॉम्प्लेक्स भागातील नागरिकांकडून अनेक वेळा माती टाकून अथवा सिमेंट क्रांक्रीट टाकून तो खड्डा बुजवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु काही दिवसातच माती व खड्डी निघून जात असल्याने त्या ठिकाणी पुन्हा खड्डा पडत आहे.

यासंदर्भात नगरपालिका प्रशासनाला सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व सहका-यांनी नगरविकास मंत्री व नगर विकास सचिवांना लेखी तक्रार करत त्या खड्ड्यात बेशरमाची झाडे लाऊन कंत्राटदार आणि नगरपालिका प्रशासनाचा निषेध करण्याचा इशारा दिला होता.त्यामुळे नगर परिषद प्रशासनाकडून तो खड्डा तातडीने बुजविण्यात आला. मात्र सिमेंट रोडवरील खड्डा बुजविण्यासाठी डांबरी रस्तेकामाचा मलबा टाकुन खड्डा बुजविण्यात आला आहे. मात्र अशाप्रकारे थातुरमातुर काम करून उपयोग होणार नाही कारण काही दिवसातच पुन्हा खड्डा पडणार आहे.त्यामुळे कायमस्वरूपी उपाय म्हणून संपूर्ण सिमेंट ब्लॉक कट करूनच खड्डा बुजवावा लागेल.

## नाटकामुळे मुलांच्या जगण्यात आत्मविश्वास येतो– ॲड. थिगळे

बीड। प्रतिनिधी

नाट्यकला केवळ मनोरंजनासाठी नसते तर त्यामुळे मुलांचे व्यक्तिमत्व विकसित होऊन त्यांच्या जगण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो त्यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वात नाटक हे एक महत्त्वाचे माध्यम असते असे प्रतिपादन प्रसिद्ध विधीज्ञ तथा संस्कार प्रबोधिनीचे कार्यवाह ॲड. कालिदासराव थिगळे यांनी केले. परिवर्तन प्रतिष्ठान तर्फे सादर करण्यात आलेल्या डॉ. सतीश साळुंके लिखित आणि सुधा साळुंके दिग्दर्शित 'काऊमॅऊ' या बालनाटकातील संस्कार विद्यालयातील बालकालावंत व नाटकाच्या उभारणीस सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा भव्य सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी ॲड. थिगळे बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे संचालक दिलीप खिस्ती, सुनील क्षिरसागर, मुख्याध्यापक सतीश गंधे व पर्यवेक्षक तावरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आरंभी सरस्वती पूजन करण्यात येऊन मान्यवरांचा परिवर्तन तर्फे सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परिवर्तनचे अध्यक्ष डॉ. सतीश साळुंके यांनी केले. आपल्या भाषणात ॲड. थिगळे पुढे म्हणाले की गेल्या तीस वर्षापासून साळुंके हे सातत्याने शालेय कलावंतांसाठी नाटकाच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकासाची मूलभूत काम करीत आहेत. त्यामुळे शाळेला राज्यस्तरावर अनेकदा पहिल्या क्रमांकाची नाटकाचे आणि अभिनयाची बक्षिसे मिळाले व शाळेचे नाव सर्व दूर झाले. शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श हा मुलांच्या व्यक्तिमत्वाला व्हायला हवा याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणून डॉ साळुंके यांच्याकडे पाहायला हवे असे प्रतिपादन ॲड. थिगळे यांनी केले.

आपल्या प्रास्ताविकात सतीश साळुंके म्हणाले की, बीडच्या नाट्यक्षेत्रात संस्कार विद्यालयाचा मोठा वाटा आहे.ॲड. थिगळे यांनी सातत्याने दिलेले प्रोत्साहन व शिक्षक वृंदांनी केलेले सहकार्य यामुळेच आपण नाट्यक्षेत्रात संस्कार चे नाव करू शकलो. यावेळी या नाटकातील बालकालावंत नीरज उमाकांत हुलजुते, संस्कृती दत्तात्रय निळकंठ तसेच 'काश्मीर स्माईल' या नाटकातील बालकलावंत आस्था गिरीश सोहनी यांना अभिनयाची पहिली बक्षीसं आणि सन्मानचिन्ह , प्रमाणपत्र देण्यात आली. याशिवाय आर्या अशोक ठोकरे, संयुक्ता श्रीकांत बेदरे, तेजस्विनी जगदीश आनेराव, अद्वित प्रदीप ससाने, सारथी तुकाराम साठे, अर्णव प्रदीप ससाणे, सर्वेश सुनील राऊतमारे, संस्कार दत्तात्रय निळकंठ, लक्ष्मीकांत शशिकांत मोरे, देवश्री दिलीप कुलकर्णी, वृंदा ज्ञानेश्वर कुटे, ईश्वरी राकेश गावस्कर, अवणी अमोल तांदळे आणि अक्षरा सुशील लोळगे या बालकलावंतांना पुरस्कार व सन्मानचिन्ह देण्यात आली. याशिवाय नाटकाच्या उभारणीसाठी महत्त्वाची भूमिका पार पाडणारे व सहकार्य करणारे नितीन धायगुडे, दीपिका लोळगे, अण्णासाहेब गडदे, मंगेश रोटे, मुकुंद धुताडमल,प्रथमेश खडकीकर व प्रा. प्रवीण निसर्गंध यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मंगेश रोटे यांनी केले. यावेळी पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## युवा प्रशिक्षणार्थीचा राज्य व्यापी महामेळावा

जालना। प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारने युवा प्रशिक्षणार्थी मुला मुलींना रोजगार उपलब्ध करून दिला परंतु रोजगार सहा महिन्याकरता शासकीय कार्यालयामध्ये करून दिला होता. शासनाच्या अधिकाऱ्याने तसेच लेखी आदेश देण्यात आला आहे परंतु आता महाराष्ट्र राज्य सरकारने आता युवा प्रशिक्षणार्थी यांना मुदत वाढ देण्यात यावे. याकरता संघटना, महाराष्ट्रपश्चिम महाराष्ट्र प्रमुख ह.भ.प. तुकाराम बाबा महाराज यांच्या नेतृवाखाली युवा प्रशिक्षणार्थीचा महाराष्ट्र राज्य व्यापी महामेळा होणार आहे.

यावेळी संस्थापक व प्रमुख उपस्थिती राहणार आहे.महामेळावाप्रमुख मागण्या प्रशिक्षणानंतर कायम रोजगार देण्यात यावा. तसेच विद्या वेतनमध्ये वाढकरण्यात यावी. विद्यावेतन नियमित व वेळेवर देण्यात यावे. युवा प्रशिक्षरार्थींना शासकीय सेवेत १०% आरक्षण देण्यातयावे.शासकीय कर्मचारीप्रमाणे रजा अनुज्ञेय असावी. सदरील महामेळावा दि. १२/२/२०२५ रोजी अझाद व्यायाम मंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्टेडीअम शेजारी, सांगली.येथे सकाळी दहा वाजता होणार आहे. नियोजन सहकारी सर्व जिल्हा प्रमुख व सर्व प्रशिक्षणार्थी संपर्क प्रमुख: खालीद मुल्ला ८८०५१२१७१६ संपर्क प्रमुख आर्यन पाटोळे ९६९९८३०३०० संपर्क प्रमुख अण्णाप्पा नंदीवाले ९९२१५१५१३८ यांच्याशी संपर्क करावी

## आदित्य महाविद्याच्या आठ विद्यार्थ्यांची निवड

बीड। प्रतिनिधी

आदित्य शिक्षण संस्थेचा शिक्षण क्षेत्रात दबदबा कायम असताना क्रीडा क्षेत्रातही मागे नसल्याचं कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले.गडचिरोली येथे १८ ते २२ फेब्रुवारी दरम्यान होणाऱ्या २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीच्या विविध संघामध्ये आदित्य कृषि महाविद्यालयाच्या आठ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सवासाठी सदरील खेळाडूची निवड ही विद्यापीठ अंतर्गत असलेल्या विविध कृषी व संलग्न महाविद्यालयाच्या स्पर्धा घेऊन विद्यापीठाचे तज्ज्ञ क्रीडा अधिकारी यांच्यामार्फत केली जाते. या स्पर्धा गोडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे १८ ते २२ फेब्रुवारी २०२५ दरम्यान होत आहेत. या निवडीबद्दल संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. कल्याण आपेट यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## मोठेवाडी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता



माजलगाव। प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील काळा हनुमान मंदिरात आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची श्री.ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज पवार, श्री माऊली गुरूकुल वारकरी शिक्षण संस्था पंढरपूर यांच्या काल्याच्या कीर्तनाने व ग्रंथ दिंडी मिरवणूकीने सोमवारी सांगता झाली.सप्ताह काळात वेगवेगळ्या विषयांवर विविध नामवंत कीर्तनकारांकडून समाजप्रबोधन करण्यात आले.श्री.ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पवार यांनी कीर्तनातून आईवडिलांचा सांभाळ करावा, असे आवाहन केले. आईवडिलांची सेवा हाच धर्म असल्याचे त्यांनी सांगितले. ज्ञानेश्वर महाराजांनी भगवान श्रीकृष्णाने अवतार घेतल्यापासून बालपणी केलेल्या लीलांचे वर्णन त्याचप्रमाणे अवतार संपेपर्यंत जीवनप्रवासावर प्रबोधन केले.मोठेवाडी येथील सप्ताह समितीच्या वतीने श्री. ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज पवार, गणेश म.वाघमारे, लक्ष्मण म.पांचाळ, आकाश म.कदम,उत्तम म.चोथे,मृदंगाचार्य राम महाराज गायकवाड यांचा सत्कार करण्यात आला. दहीहंडीच्या कार्यक्रमाने सप्ताहाची सांगता करण्यात आली.समस्त मोठेवाडी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन केले होते.


### जाहीर प्रगटन

**मा. श्री. एम. आय. एस. दर्यावर्दी, ७ वे दिवाणी न्यायाधीश क. स्तर, बीड, ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६८/२०२५**

**ॲड. व्ही. एस. मिसाळ यांचे मार्फत**

**अविनाश व ईतर वि. निरंक**

ज्याअर्थी लक्ष्मीकांत पि. माधवराव पंडीत, हे दिनांक १६.१२.२०२४ रोजी शुअरटेक हॉस्पीटल अँड रिसर्च सेंटर, नागपुर ता. जि. नागपुर येथे मयत झालेले आहेत त्याअर्थी, १. अविनाश पि. लक्ष्मीकांत पंडित, वय- ३२ वर्षे, धंदा- खाजगी नोकरी रा. सुलक्ष्मी निवास, लोकसेवा मंगल कार्यालयाजवळ, तुळजाई चौक, कॅनॉल रोड, बीड, ता. जि. बीड, २ . सुनिता भ्र. लक्ष्मीकांत पंडित, वय ५७ वर्षे, धंदा घरकाम रा. सदर अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क्र. २ ही मयताची पत्नी आहे. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा/अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**प्रकरणाची पुढील तारीख १५.०३.२०२५ ही आहे.**

**आज दिनांक ११.०२. २०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.**

स्वाक्षरित
**क लिपीक**
दिवाणी न्यायालय व. स्तर
बीड

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर बीड


## डॉ.गणेश ढवळे चंपावती सन्मान पुरस्काराने सन्मानित

बीड। प्रतिनिधी



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे आणि संसदरत्न खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त बीड मध्ये आयोजित एकनाथजी शिंदे महाकरंडक व चंपावती महोत्सवात दि.०८ शनिवार रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात झालेल्या भव्यदिव्य बक्षीस वितरण कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांना त्यांच्या सामाजिक कार्यात दिलेल्या योगदानाबद्दल दै.लोकाशाचे संपादक विजयराज बंब, शिवसेना जिल्हाप्रमुख आनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळुक, जिल्हाप्रमुख स्वप्निलभैय्या गलधर यांच्या शुभहस्ते " चंपावती सन्मान" पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्कार स्वीकारताना डॉ.गणेश ढवळे यांचे सामाजिक चळवळीतील सहकारी शेख युनुस,सुदाम तांदळे,शिवशर्मा शेलार आदी उपस्थित होते. बीड जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सवात सामाजिक कार्याची दखल घेऊन पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल डॉ.गणेश ढवळे यांनी चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिकजी कांबळे यांचे आभार मानले.

राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला बीड जिल्हा म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी नवकलाकारांची पिढी समृद्ध होणार गरजेचे आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा. या उदात्त हेतूने ३ वर्षांपासून पासून चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप सचिन भैय्या मुळक स्वप्नील भैया गलधर आणि बीड कलावंत यांनी एकत्रित येऊन बीड शहरात दि.१ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी पर्यंत नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी अशा विविध स्पर्धा पार पडल्या.दि.८ फेब्रुवारी रोजी यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात बक्षिस वितरण समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला. कलाकारांचा अनोखा महाकुंभ बनलेल्या कलावैभवसिद्ध बालेकिल्ल्याचा विक्रमादित्य चंपावती महोत्सवात यावर्षी १४ हजार ७ बाल कलाकारांच्या सहभागामुळे चंपावती महोत्सव लिमका गिनिज बुकाच्या उंबरठ्यावर जाऊन पोहोचला असुन जिल्ह्याभरातील बाल कलाकारांच्या हक्काची आणि जिव्हाळ्याची स्पर्धा बनलेला चंपावती महोत्सव शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळुक, स्वप्निल गलधर यांच्या पुढाकाराने आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे यांच्या संकल्पनेतून साकार झालेला चंपावती महोत्सव लिमका गिनिज बुकमध्ये नोंद करून बीडचा नवा इतिहास रचण्यासाठी तयार झाला असुन ही बाब बीडकरांसाठी कौतुकास्पद आणि अभिमानास्पद आहे.

## माघ पौर्णिमेनिमित्त संगीत भजनाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

श्री दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे परमपूज्य सद्गुरु प.पु.ष.ब्र.श्री १०८ शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांच्या कृपाशीर्वादाने व दत्त उपासक श्रीहरी वैजिनाथ महाराज यांच्या अधिपत्याखाली बालाघाट डोंगर परिसरात श्री दत्त संस्थान कपिलधारवाडी (मांजरसुंबा) येथे प्रत्येक पौर्णिमेला विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. माघ पौर्णिमेनिमित्त बुधवार दि.१२ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी नऊ ते अकरा यावेळी संगीत भजनाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या संगीत भजनामध्ये संगीत क्षेत्रातील मान्यवर व्यक्तींची हजेरी राहणार आहे तसेच दत्तमूर्ती महाभिषेक, महारुद्राभिषेक यानंतर दुपारी बारा वाजता महाआरती होऊन होणार आहे तरी या सर्व पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे संस्थांचे दत्त उपासक श्रीहरी वैजिनाथ महाराज शिंदे यांनी केले आहे. या पौर्णिमेनिमित्त गणेश महादेव उनवणे, शिवाजी दत्तू बोबडे यांचा महाप्रसाद होणार आहे. तरी सर्व भावीक भक्तांनी या कार्यक्रमाचा महाप्रसादाचा लाभ घ्यावा.

# खताबरोबर खरेदी करावा लागतोय नॅनो युरिया लिक्विड

**आष्टी । शरद रेडेकर**

**उन्हाळी पिकांसाठी आवश्यक असलेल्या युरिया खताचा आष्टी तालुक्यात तुटवडा निर्माण झाला आहे. ज्या विक्रेत्यांकडे युरियाचा साठा शिल्लक आहे, असे विक्रेते शेतकऱ्यांना युरिया पॅकेटसोबत नॅनो युरिया लिक्विड घेण्याची सक्ती करत असल्याचा प्रकार आष्टी तालुक्यात समोर आला आहे. यामुळे शेतकरी हवालदिल झाला असून त्यांना नाहक भुर्दंड सहन करावा लागतो.**



**आष्टी तालुक्यात सध्या युरिया खत मिळणे दुरापास्त झाले आहे. शेजारील जामखेड (जि. अहिल्यानगर) तालुक्यातून युरिया आणावा लागतो. युरिया खत उपलब्ध असलेले काही दुकानदार युरियाच्या पिशवीसोबत नॅनो युरिया घेण्यासाठी सक्ती करीत आहेत. हा एकप्रकारे शेतकऱ्यांवर अन्यायच आहे.**
**-भाऊसाहेब तवले**

**नव्याने विकसित करण्यात आलेली नॅनो टेक्नॉलॉजी शेतकऱ्यांसाठी आर्थिकदृष्ट्या फायदेशीर व जास्तीचे पीक उत्पादन देणारी आहे. नॅनो युरिया, डीएपी वापरण्याबाबत शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्याच्या शासनाच्याही सूचना आहेत. मात्र, हे ऐच्छिक असून तशी कोणतीही सक्ती नाही.**
**- गोरख तरटे, तालुका कृषी अधिकारी, आष्टी**

आष्टी तालुक्यात सध्या युरिया खताचा तुटवडा निर्माण झाला आहे. युरिया खरेदी करताना काही कृषी दुकानदार नॅनो युरिया लिक्विड खरेदी करण्याची सक्ती शेतकऱ्यांना करत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. यामध्ये शासनाकडूनच लिक्विड स्वरूपातील युरिया वापरास सांगण्यात आल्याचे सांगून दोन ते तीन पिशव्यांसोबत नॅनो लिक्विड युरियाची एक बाटली घेण्याची सक्ती खत विक्रेत्यांकडून होत आहे.याबाबत कोणतीही सक्ती करण्यात आली नसल्याचा खुलासा कृषी अधिकारी गोरख तरटे यांनी केला आहे. अशी सक्ती कोणी करत असेल तर त्याबाबत तातडीने कृषी विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन तरटे यांनी केले आहे. प्रोत्साहन देण्याच्या शासनाच्या सूचना असल्या तरी ८० टक्के पिकांना नॅनो युरिया लिक्विड लागू होत आहे. यामुळे उत्पादन खर्चात बचत होत असल्याचे शासकीय परिपत्रक असल्याचेही तरटे म्हणाले.

## पारदर्शक आणि निकोप वातावरणात परीक्षा पार पडण्यासाठी विद्यार्थी, पालकांसह समाजानेही पुढाकार घ्यावा-आ.मुंदडा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यातील इयत्ता १२ वी आणि १० वीच्या परीक्षा पूर्णतः भयमुक्त आणि कॉपीमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी शासनाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि संपूर्ण समाजाने परीक्षांचे पारदर्शक व निकोप वातावरण राखण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले आहे.



आ. नमिता मुंदडा यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण हा सर्वात मोठा आधारस्तंभ आहे. आगामी परीक्षांना तुम्ही निर्धास्त, आत्मविश्वासाने आणि प्रामाणिकपणे सामोरे जा. शिक्षण हे केवळ गुणांसाठी नसून, ते तुमच्या ज्ञानवृद्धीचे आणि जीवन घडविण्याचे साधन आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या शॉर्टकटचा अवलंब न करता प्रामाणिकतेच्या जोरावर यश मिळवा. विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या काळात आत्मविश्वास कायम ठेवावा आणि त्यांना सकारात्मक ऊर्जा मिळावी यासाठी पालक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे योग्य मार्गदर्शन करावे आणि मानसिक तयारी करून द्यावी, असेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्राची शैक्षणिक अस्मिता जोपासण्यासाठी आपण सर्वांनी मिळून शिक्षणाला प्रामाणिकतेच्या आणि न्यायाच्या मार्गाने पुढे नेण्याचा संकल्प करूया. विद्यार्थ्यांनी मेहनतीवर विश्वास ठेवावा, शिक्षण संस्थांनी त्यांना योग्य मार्गदर्शन द्यावे आणि पालकांनी नैतिक शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. जिल्हा प्रशासनाची परीक्षांसाठी विशेष तयारी आगामी परीक्षा काळात सर्व परीक्षा केंद्रे भयमुक्त आणि कॉपीमुक्त राहतील याची खात्री करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. परीक्षांदरम्यान कोणत्याही प्रकारचा गैरप्रकार होऊ नये म्हणून कडक उपाययोजना आखण्यात आल्या आहेत. राज्यातील शिक्षणव्यवस्थेच्या विश्वासार्हतेला आणि नैतिकतेला बळ देण्यासाठी शासनाने कॉपी प्रकरणांना पूर्णतः प्रतिबंध घालण्यासाठी कठोर पावले उचलली आहेत.



**गेवराई : ह.भ.प.महादेव महाराज चाकरवाडीकर गेवराईत कीर्तन महोत्सवानिमित्त आले असता माऊली ग्रुपच्या वतिने जगदाळे व अंबादास गिरी यांनी स्वागत करून आशिर्वाद घेतले यावेळी माऊली भक्त मोठ्याप्रमाणात उपस्थित होते**

## पालकांनी आपले स्वप्न पाल्यावर लादू नयेत -भागवत मसने

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपले अपूर्ण राहिलेले किंवा पाहिलेले स्वप्न आपल्या पाल्यावर न लादण्याचे आवाहन सुप्रसिद्ध वात्रटीकाकार तथा कवी भागवत मसने यांनी केले आहे. ते ज्ञानगंगा मुलांचे गुरुकुल येथे आयोजित विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यात भागवत मसने बोलत होते. प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी हा विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात विद्यार्थ्यांनी आपल्या अंगी असलेले विविध गुणदर्शन



देखील या कार्यक्रमातून सादर केले. याप्रसंगी व्यासपीठावर जी डी चव्हाण, माजी नगरसेवक संजय गंभीरे, सदाशिव डोरले, पंडित चव्हाण, नामदेव शेरे, रामकीसन मस्के, इंजि बाळाप्रसाद थावरे, उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात दीप्रज्वलन करून राष्ट्रमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक दिगंबर सोळंके यांनी केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात सुप्रसिद्ध वात्रटिकाकार भागवत मसने यांनी आपल्या कविताच्या माध्यमातून पालकांनी आपल्या पाल्यावर कशाप्रकारे मैत्रीपूर्ण नियंत्रण ठेवावे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. आपला पाल्य समाजात वावरत असताना तो सुसंस्कृत कसा घडेल याची दक्षता घ्यावी हे देखील पटवून सांगितले. पाल्यांचे वय वर्ष १८ पूर्ण झाल्यानंतरच पालकांनी पाल्याला दुचाकी गाडी द्यावी असा सल्ला भागवत मसने यांनी उपस्थित विद्यार्थी व पालकांना दिला.मुलाला दाढी किंवा मिशी आली म्हणजे त्याला अक्कल आली असं होत नसते. म्हणून शासनाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करून पालकांनी सामाजिक स्वास्थ्य निर्माण करण्यासाठी आपलं योगदान द्यावे. त्याचबरोबर आपणाकडून एखादी गोष्ट करावयाची अपूर्ण राहिली असेल किंवा आपण पाहिलेले एखादे

◀◀ पान ३ वर

## घरकुल आवास योजनेसाठी लाभार्थी धारकांना शासकीय जागा उपलब्ध करुन द्या-यशवंत उजगरे

**वडवणी । प्रतिनिधी**

**केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रधानमंत्री घरकुल आवास योजना सक्षमपणे राबविली जात आहे. ज्या कुंटुबात स्थानिकचे असल्याचे सर्व कागपत्रे व पुरावे उपलब्ध आहेत. रहिवाशी आहेत. अशा कुंटुबाकडे फ्लाँट अथवा जमिन नाही अशा कुंटुबासाठी शासनाने जागा उपलब्ध करुन त्यांना सदरील योजनेचा लाभ द्यावा अशी मागणी मनसेचे बीड जिल्हासचिव यशवंत उजगरे यांनी मागणी केली आहे. याबाबतचे निवेदन जिल्हाधिकारी, तहसिलदार आणि वडवणी न,प. यांना ईमेलवर पाठवले आहे.**



बीड जिल्ह्यातील वडवणी तालुका हा क्षेत्रफळाने सर्वात छोटा असलेला तालुका आहे. बीड परळी हायवे वरती असल्याने इथल्या जमिनीला प्लॉटिंगचे मोठे जाळे आहे. त्यामुळे या ठिकाणी सर्वसामान्य मजूर आणि गरीब लोकांना स्वतःची जागा किंवा प्लॉट घेणे अत्यंत कठीण आहे. तसे वडवणी शहरांमध्ये मोजकेच धंदे असल्याने आणि शेतीला देखील पाण्याची वानवा असल्यामुळे या ठिकाणी रोजगार आणि नोकरी फार कमी प्रमाणात उपलब्ध आहे. त्यामुळे मोठ्या किमतीचे प्लॉट किंवा जागा सर्वांना घेणे शक्य नाही. म्हणून सर्वसामान्य गरीब लोकांना प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत आपल्याही घराचे स्वप्न पूर्ण व्हावे असे वाटते. मात्र त्यांच्याकडे स्वतःची जागा किंवा प्लॉट नसल्यामुळे त्यांना या योजनेचा लाभ घेता येत नाही. त्यांचे घराचे स्वप्न अपूर्णच राहते. त्याकरिता

◀◀ पान ३ वर

## सोशल मीडियाचा वापर जितका चांगला तितकाच घातक –प्रदीप कुलकर्णी

माजलगाव । प्रतिनिधी

मोबाईलच्या आभाशी दुनियेपासून आपल्या पाल्यांचा बचाव करणे हे सर्वात मोठे आवाहन पालकांसमोर उभे ठाकले आहे असे प्रतिपादन संपादक प्रदीप कुलकर्णी यांनी माजलगाव येथील राजस्थानी विद्यालयात स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना केले.

प्रारंभी प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे स्वागत राजस्थानी विद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांनी व शाळेतील शिक्षकांनी केले. प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या अंगावर पुष्पवृष्टी करण्यात आली कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव रामानंद लड्डा हे होते तर स्नेहसंमेलनाचे उद्घाटन राजस्थानी सेवा समाज बीड चे सचिव रामेश्वर कासट यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध कवी तथा शिक्षक मोहन राठोड , पालक प्रतिनिधी म्हणून अर्चना डाके व माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष रमेशचंद्र कासट आदी मान्यवर उपस्थित होते.




पुढे बोलताना ते म्हणाले की सोशल मीडियामुळे सगळे जग जवळ आले आहे आपला पाल्य आपल्यापेक्षा चांगल्या रीतीने मोबाईल हाताळताना आपल्याला दिसतो आहे ज्या गोष्टी आपल्याला कळणार नाही ते त्याला कळू

◀◀ पान ३ वर

## मौजवाडीतील शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत सेंद्रिय शेतीचे धडे

**घाटसावळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन कृषी विभाग बीड यांच्यामार्फत शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबवल्या जातात. डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन आत्मा अंतर्गत संपूर्ण बीड जिल्ह्यात राबवला जात आहे. बीड तालुक्यात तालुका कृषी अधिकारी मा. श्री साळी साहेब मंडळ कृषी अधिकारी श्री अंबुरे साहेब व कृषी पर्यवेक्षक श्री जांभळकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील



मौजे मौजवाडी येथील तुळजाभवानी शेतकरी गटास सेंद्रिय शेती प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षण कार्यक्रमास तज्ञ मार्गदर्शक म्हणून सोनाजीराव क्षीरसागर कृषी तंत्र विद्यालय राजुरी ( न. ) येथील प्राचार्य श्री एस.बी. पोकळे, तसेच सेंद्रिय शेती विषय तज्ञ श्री गोसावी सर, आत्म विभागाचे

◀◀ पान ३ वर

## पुतळाबाई राठोड यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील मोगर शिवाजीनगर तांडा येथील जुन्या पिढीतील व्यक्तीमहत्व, धार्मिक वृत्तीच्या मनमिळाव स्वाभाच्या पुतळाबाई सोमा राठोड यांचे राहत्या घरी दि.१० फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२.४५ वाजता देवाज्ञा झाली. निधन समयी त्याचे वय १०३ वर्षे होते. मागील काही दिवसांपासून वृद्धापकाळाने थकल्या होत्या. गावातील एक जुन्या जाणत्या आणि सर्वांना मायची आस असलेल्या मनमिळावून स्वभावाच्या पुतळाबाई राठोड होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले लालू सोमा राठोड, प्रभाकर सोमा राठोड, उत्तम सोमा राठोड तर चार मुली शारदा चव्हाण, शानु चव्हाण, सिता चव्हाण आणि कौसा जाधव यासह सुना, नातू नातवंडे असा मोठा परिवार असून राठोड परिवाराच्या दुःखात दैनिक लोकतंत्र परिवार सहभागी आहे.



## माजलगाव तहसिलदारांची तात्काळ बदली करा

### उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार – सय्यद सलिम बापु

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील तहसिलदार हे शासनाच्या जीआर प्रमाणे कार्यवाही करत नाहीत व देवस्थान इनामी जमिनी यांच्या कामाबाबत टाळाटाळ करतात संजय गांधी इंदिरा गांधी यांच्या योजने बाबत मोठ्या प्रमाणात गोंधळ झाला असून या गोंधळाबाबत तात्काळ त्रिस्तरीय समिती गठीत करून चौकशी करण्यात यावी व तसेच देवस्थानचे इनामी जमिनी व गायरण जमिनी व हेरिंग बाबत माजलगाव तहसीलदार हे कोणतीही चौकशी न करता सतत चुकीची माहिती देत असुन एका रूम मध्ये कागदपत्रांची पूर्तता होत नाही व नकला मागितल्या असता जीर्ण झाले आहेत असे लिहून देतात इतकेच नव्हे तर पुरवठा विभागामध्ये गरिबांची कामे होत नाहीत गरिबांच्या कामांमध्ये वारंवार हेळसांड करतात यापूर्वी दिनांक ०६ डिसेंबर २०२४ रोजी तहसीलदार माजलगाव यांना निवेदन दिले होते तरी देखील त्यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही सदरील मागण्याचे गांभीर्य लक्षात घेऊन वरील सर्व मागण्या पूर्ण करण्यात याव्यात अन्यथा दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी सय्यद सलीम बापू यांच्या नेतृत्वाखाली आपल्या कार्यालयासमोर निदर्शने करण्यात येणार असल्याचे निवेदन ॲड ए एन सय्यद बीड जिल्हाध्यक्ष आंबेडकरी विचार मोर्चा आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा यांच्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना देण्यात आले आहे.



## सोयाबीन प्रश्नांवर महाविकास आघाडी आक्रमक, संसदेत निदर्शने

**जालना । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील सोयाबीन उत्पादक शेतकरी शासनाच्या वेळकाढूपणामुळे अडचणीत सापडले आहेत. राज्यातील 'नाफेड'च्या माध्यमातून सोयाबीन खरेदी सुरू असली तरी, अनेक शेतकऱ्यांचा अद्यापही सोयाबीन खरेदी करण्यात आलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.



राज्यात मोठ्या प्रमाणात सोयाबीन शिल्लक असून, खरेदी प्रक्रियेस मुदतवाढ मिळाली नाही तर शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती आहे. तसेच, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य भाव मिळावा, अशी मागणी केली जात आहे. या पार्श्वभूमीवर, महाविकास आघाडीच्या खासदारांनी सोमवारी संसदभवन परिसरात निदर्शने करत सरकारच्या विरोधात जोरदार घोषणा दिल्या.

◀◀ पान ३ वर

## रस्ता कामातील अनियमिततेबाबत उच्च न्यायालयाची शासनाला नोटीस

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी, पाटोदा, शिरूर तालुक्यात सन २०२२ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागा मार्फत झालेल्या पूरहानी दुरुस्ती,एफ.डी.आर.,ए.एम.सी. कामामध्ये कोट्यावधीचे कामे करण्यात आलेली आहेत परंतु हि कामे नेमकी कोणत्या ठिकाणी केली गेली व या काम मध्ये कंत्राटदार कोण व या कामाबाबतची निविदा कोणत्या दैनिकात प्रसिद्ध करण्यात आली याची माहिती नसल्याने जिल्ह्यासाठी नेमका किती निधी आला होता याची माहिती जनतेला नाही तसेच पशुवैद्यकीय दवाखानाच्या नवीन इमारती साठी २ कोटी ५० लाख रुपया पैकी ८० ते ९० टक्के रक्कम अदा करूनही अद्यापपर्यंत हे काम पूर्ण झालेले नाही तसेच वांजरा फाटा ते कुसलंब रस्ताही अपूर्ण स्थितीत आहे. व वरील कामे अत्यंत निकृष्ट दर्जाचे झालेले असल्यामुळे कैलास दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी संबंधित विभागाला निवेदन देऊन सदरील कामाची विभागीय गुणनियंत्रक पथकामार्फत तपासणी करावी अशी मागणी केली. परंतु वेळोवेळी निविदने देऊनही अद्याप पर्यंत हि तपासणी न झाल्यामुळे व दोषीवर कारवाई न झाल्यामुळे कैलास दरेकर जिल्हाध्यक्ष शेतकरी सेना मनसे बीड यांनी मा. उच्च नायायालय खंडपीठ औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. ७२/२०२४ ॲड. नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती.



सदरील याचिकेची सुनावणी दि. १०.०२.२०२५ रोजी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद झाली असता मा. न्यायमूर्ती मंगेश एस. पाटील व न्यायमूर्ती प्रफुल्ल एसं खुबलकर यांच्या समोर झाली असता मा. न्यायालयाने सदरील जनहित याचिकेत प्रतिवादी १. सचिव सार्वजनिक

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# राहुल सोलापूरकरविरोधात तीव्र आंदोलन

## ॲट्रॉसिटी आणि देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

मागील अनेक दिवसांपासून अभिनेता राहुल सोलापूरकर हे वादाच्या भोवऱ्यामध्ये अडकले आहेत. यापूर्वी सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत वादग्रस्त विधान केले होते. आग्रा सुटकेबाबत त्यांनी विधान केल्यामुळे राजकीय नेत्यांसह सर्वांनी रोष व्यक्त केला. यानंतर राहुल सोलापूरकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत विधान केले. यामुळे नवीन वादाला तोंड फुटले आहे. राहुल सोलापूरकर यांच्याविरोधात राज्यभरामध्ये वातावरण तापले आहे. पुण्यामध्ये देखील राहुल सोलापूरकर विरोधात आंदोलन करण्यात आले आहे. सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने आंदोलन करण्यात आले आहे.




अभिनेता राहुल सोलापूरकर यांनी महापुरुषांवर वादग्रस्त वक्तव्य करण्याची मालिका सुरू ठेवली आहे. आधी छत्रपती शिवाजी महाराज आणि आता भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांवर आक्षेपार्ह वक्तव्य करून महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा बिघडविण्याचे काम सोलापूरकर करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.. सोलापूरकर यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्या वतीने आज सोलापूरकरच्या घरासमोर तीव्र आंदोलन करण्यात आले. यावेळी बोलताना परशुराम वाडेकर म्हणाले, राहुल सोलापूरकर महाराष्ट्रातील सामाजिक सलोखा बिघडविण्यासाठी जाणीवपूर्वक वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. ज्या माणसाने राजर्षी शाहू महाराजांची भूमिका केली त्याला भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोण आहेत? यांची पूर्णपणे कल्पना आहे, तरीही हा व्यक्ती वादग्रस्त वक्तव्य करत आहे, त्यांच्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्रॉसिटी आणि देशद्रोहाचा गुन्हा तत्काल दाखल करून त्याला अटक करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

शहराध्यक्ष संजय सोनवणे म्हणाले, राहुल सोलापूरकरने केलेले वक्तव्य अत्यंत निंदनीय आहे. महापुरुषांविरुद्ध जाणीवपूर्वक वादग्रस्त वक्तव्य हा व्यक्ती करत आहे. पोलिस आणि राज्य सरकारने त्याला पाठीशी घालू नये, त्याचे पोलिस संरक्षण त्वरित कमी करावे आणि त्याच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून पोलिस कोठडीत त्याची रवानगी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.शरद पवार गटाचे नेते व आमदार जितेंद्र आव्हाड यांनी काही दिवसांपूर्वी सोशल मीडियावर शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये राहुल सोलापूरकर म्हणाले की, रामजी सपकाळ यांच्या एका बहुजनाच्या घरात जन्माला आलेले एक भिमराव की जो आंबावडेकर नावाच्या एका गुरुजीकडून दत्तक घेतला जातो. त्याच नावावरून पुढे भिमराव आंबेडकर म्हणून मोठे होतात. त्यांनी प्रचंड अभ्यास केल्यामुळे वेदांमध्ये जस म्हटलं आहे, तसं ते अभ्यास करून मोठे झाले आहेत त्या आर्थाने वेदांमध्ये भीमराव आंबेडकर ब्राह्मण ठरतात असं वादग्रस्त वक्तव्य राहुल सोलापूरकर याने केलं आहे. यापूर्वी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत देखील वादग्रस्त विधान केले होते. राहुल सोलापूरकर म्हणाले होते की, छत्रपती शिवाजी महाराज यांची आग्र्याहून सुटका कशी झाली? याबाबत राहुल सोलापूरकर यांनी अजब दावा केला आहे. महाराज आग्र्याहून सुटले, तेव्हा मिठाईचे पेटारे वगैरे काही नव्हते. चक्क लाच देऊन आले, त्यासाठी किती हुंडा वठवला, त्याचेही पुरावे आहेत. अगदी औरंगजेबाच्या वजिराला आणि त्याच्या बायकोलाही महाराजांनी लाच दिली आणि त्यांच्याकडून अधिकृत शिक्के घेऊन ते बाहेर पडले, असे धक्कादायक विधान राहुल सोलापूरकर यांनी केलं होतं. यामुळे राज्यभरामध्ये रोष व्यक्त करण्यात आला होता. हे प्रकरण तापल्यानंतर राहुल सोलापूरकर यांनी जाहीर माफी देखील मागितली होती. आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे.

# पोलिस असल्याची बतावणी, दागिने ठेवण्याचा बहाणा; शिक्रापुरातील महिलेला लुटले

शिरुर । प्रतिनिधी

राज्यात लुटमारीच्या घटना वाढत असून, यामुळे नागरिकही हैराण झाले आहेत. अशातचं आता शिरुर तालुक्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. शिक्रापूर (ता. शिरुर) येथील प्रतिभा पनिकर या रस्त्यावरुन निघालेल्या असताना दुचाकीवरुन आलेल्या दोघांनी पोलिस असल्याची बतावणी करत अडीच तोळ्याचे दागिने लंपास केले आहे. याप्रकरणी प्रतिभा सतीशन पनिकर (वय ५०, रा. त्रिमूर्ती नगर शिक्रापूर, ता. शिरुर, जि. पुणे) यांनी शिक्रापूर पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. हॉटेल निखील समोर हा प्रकार घडला.

प्रतिभा पनिकर या निघालेल्या होत्या. यादरम्यान चोरट्यांनी त्यांना पोलिस असल्याचे सांगत गावामध्ये चोऱ्या होते आहे, महिलांचे गळ्यातील दागिने कापून नेत आहेत असे सांगितले. तसेच पनिकर यांच्या गळ्यातील दागिने पेपरमध्ये गुंडाळून पर्समध्ये ठेवण्यास सांगून हातचलाखी करत प्रतिभा यांच्या गळ्यातील अडीच तोळे वजनाचे दागिने हातचलाखीने काढून घेत त्यांनी दुचाकीवरुन पोबारा केला. याबाबत प्रतिभा पनिकर यांनी शिक्रापूर पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली असून, पोलिसांनी दोघा अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलिस निरीक्षक दिपरतन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विश्वांबर वाघमारे करत आहेत. शिरुर तालुक्यातील गोलेगाव येथे दोन दिवसांपूर्वी एका ज्येष्ठाला पोलीस असल्याच्या बहाण्याने लुटल्याची घटना ताजी असताना लगेचच शिक्रापूर येथे अशीच घटना घडली. या दोन्ही घटनेने शिरुर तालुक्यात खळबळ उडाली आहे.




संग्रहित छायाचित्र

### पुण्यात पुन्हा तेच चोरटे ॲक्टीव्ह?

पुण्यातही सहा वर्षांपुर्वी सोनसाखळी चोरट्यांनी मोठ्या प्रमाणात धुमाकूळ घातला होता. दिवसाला तीन ते चार सोनसाखळी चोरीच्या घटना घडत असत. पादचारी महिला तसेच ज्येष्ठ महिला या चोरट्यांच्या टार्गेटवर असत. तीन राज्यात या टोळ्यांनी मोठा गोंधळ घातला होता. पुणे पोलिसांनी तीन राज्यातील माहिती एकत्रित करून या चोरट्यांचा माग सुरू केला होता. नंतर यातील काही टोळ्यांना पकडण्यात यश देखील आले होते. त्यांच्यावर मोक्कासारखी कारवाई देखील केली होती. नंतर या घटना थांबल्या होत्या. परंतु, आता पुन्हा सहा वर्षांनी सोन साखळी टोळ्या क्टीव्ह झाल्याचे गेल्या काही महिन्यांपासून दिसत आहे. त्यामुळे पुन्हा तेच चोरटे क्टीव्ह झाले आहेत का ? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

# ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारासमोर तरुणाला लूटले; कोयत्याचा धाक दाखविला



पुणे । प्रतिनिधी

पुणे शहरात लुटमारीच्या घटना वाढल्या असून, ससून रुग्णालय परिसर तसेच वारजे भागात पादचाऱ्यांना शस्त्राचा धाक दाखवून त्यांना लुटल्याच्या घटना घडल्या आहेत. याप्रकरणी बंडगार्डन आणि वारजे पोलीस ठाण्यात चोरट्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी २७ वर्षीय तरुणाने बंडगार्डन पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानूसार चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार तरुण भोसरीत राहायला आहे. तो सोमवारी सकाळी साडेपाचच्या सुमारास ससून रुग्णालयाजवळून निघाला होता. ससून रुग्णालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर पाच चोरट्यांनी त्याला अडवले. त्याला कोयत्याचा धाक दाखवून १५ हजार रुपयांचा मोबाइल चोरुन नेला. पोलीस उपनिरीक्षक गणेश चव्हाण तपास करत आहेत. दुसऱ्या एका घटनेत वारजेतील रामनगर परिसरात पादचारी तरुणाला कोयत्याच्या धाकाने लुटले असून, त्याच्याकडील ३०० रुपयांची रोकड लुटून नेली आहे. याबाबत २३ वर्षीय तरुणाने वारजे माळवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. याप्रकरणी चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार तरुण रामनगर भागात राहायला आहे. तो ८ फेब्रुवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास जेवण करुन बाहेर पडला. त्या वेळी चौघांनी त्याला कोयत्याचा धाक दाखवून खिशातील रोकड काढून घेतली. पोलीस उपनिरीक्षक सुनील जगदाळे अधिक तपास करत आहेत.



# वडगाव निंबाळकर येथे २०५ रक्तदात्यांनी केले रक्तदान

बारामती । प्रतिनिधी

वडगाव निंबाळकर (ता. बारामती) येथील श्री छत्रपती जाणता राजा युवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून शिवजयंतीनिमित्त आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात २०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

गावातील ४० मंडळातील तरुणांना सहभागी करून घेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष जितेंद्र पवार यांनी रविवारी येथील बाजारतळावर मुक्ताई ब्लड बँक इंदापूर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सकाळी नऊ ते सायंकाळी सहा पर्यंत चाललेल्या शिबिरात अनेक तरुण आणि महिलांनी रक्तदान केले.शिवप्रतिमेचे पूजन करून शिबिराला सुरुवात करण्यात आली. यावेळी सरपंच सुनील ढोले, सोमेश्वर साखर कारखान्याचे संचालक शिवाजी राजेनिंबाळकर, पंचायत समितीची माजी उपसभापती अविनाश शिंदे, आमृत दरेकर, नलेंद्र जाधव आदी उपस्थित होते. रक्तदान केलेल्या तरुणांचा सन्मान करण्यात आले. सुमारे ५०० तरुणांनी शिबिराच्या ठिकाणी भेट देऊन सहभाग नोंदवला. सहभागी तरुणांचे सुनील जाधव यांनी आभार मानले.

# श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र पंढरपूर दरम्यान रेल्वे सुरु होणार? खासदारांचे केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना निवेदन

पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील दोन प्रमुख तीर्थक्षेत्रे, देहू आणि पंढरपूर रेल्वेमार्गावर थेट रेल्वे सुरू करण्याची मागणी माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार धैर्यशील मोहिते - पाटील यांनी केली आहे. केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे सेवेबाबतच्या मागण्या मार्गी लावण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद दाखवला आहे.

देहू - पंढरपूर रेल्वे बाबत खासदार मोहिते-पाटील यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेतली असून त्यांना मागणीचे निवेदन दिले आहे. यामुळे महाराष्ट्रभरातील लाखो वारकरी भक्तांसाठी पंढरपूर-देहू रेल्वे सुविधायुक्त ठरेल असेही मोहिते-पाटील यांनी सांगितले आहे. पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच देहू येथील संत तुकाराम महाराजांचे जन्मस्थान, तसेच आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराजांची समाधी राज्यभरातील लाखो भक्तांचे प्रमुख तीर्थस्थळे आहेत. सध्याच्या परिस्थितीत देहू व पंढरपूर दरम्यान रेल्वे सेवा उपलब्ध नसल्यामुळे वारकरी भाविक भक्तांसह सामान्य प्रवाशांना अडचणी येत आहेत. खासदार मोहिते-पाटील यांनी रेल्वे मंत्रालयाकडे त्वरित ही रेल्वे सेवा सुरू करण्याची विनंती केली आहे. यासोबतच





दादर-पंढरपूर सांगोला-मिरजमार्गे सातारा ही एक्सप्रेस आठवड्यातून तीन दिवस चालते प्रवाशांच्या सोईकरता ही रेल्वे दररोज नियमित करण्यात यावी. कुर्डुवाडी जंक्शनवर पुणे-सिकंदराबाद शताब्दी एक्सप्रेसला थांब्याची मागणी केली आहे. तर हुतात्मा व उद्यान एक्सप्रेसला माढा व जेऊर येथे थांबा देण्याची मागणी केली.

# १ लाख ६० हजारांची लाच घेणं भोवलं; लिपिक महिलेसह दोघे गजाआड

पुणे । प्रतिनिधी

शिरूर उपविभागीय कार्यालयातील एका लिपीक महिलेसह दोघांना टेमघर प्रकल्प बाधितांचा प्रस्ताव मंजूर करण्यासाठी १ लाख ६० हजार रुपयांची लाच घेताना पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले आहे. या कारवाईने शिरूर तालुक्यात खळबळ उडाली आहे. शिरुर उपविभागीय कार्यालयातील लिपिक सुजाता मनोहर बडदे तसेच खासगी व्यक्ती तानाजी श्रीपती मारणे (वय ४६, रा. अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी) यांच्यावर बंडगार्डन पोलिसांत भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल केला आहे.



राज्य शासनानाने यातील तक्रारदार यांच्या जमिनीचे टेमघर प्रकल्पासाठी अधिग्रहन केली होती. शासनाकडून त्यांना शिरुर तालुक्यातील विठ्ठलवाडीत जागा देण्यात येणार होती. शेतजमीन आणि घरासाठी दोन गुंठ्यांचा भूखंड शासनाकडून त्यांना मंजूर झाला होता. तक्रारदार आणि त्यांच्या भावाच्या कुटुंबातील आठ सदस्यांचे प्रस्ताव शिरुर उपविभागीय कार्यालायातील लिपिक सुजाता बडदे यांच्याकडे प्रलंबित होते. शिरुर उपविभागीय कार्यालयातील अधिकाऱ्यांसमोर संबंधित प्रस्ताव मंजुरीसाठी प्रत्येक प्रस्तावापोटी ५० हजार रुपयांची लाच तक्रारदाराकडे मागितली होती. बडदे यांनी त्यांच्याकडे एकूण मिळून चार लाख रुपयांची लाच मागितली होती. तडजोडीतअंती प्रत्येक प्रस्ताव मंजूर करण्यासाठी ४० हजारांची लाच मागितली. आठ प्रस्ताव मंजूरीसाठी तीन लाख २० हजार रुपये देण्याची मागणी केली होती. लाचेच्या पहिला हप्त्यापोटी १ लाख ६० हजार रुपयांची लाच घेऊन तक्रारदाराला शिरुर उपविभागीय कार्यालायात बोलाविले. बडदे यांच्या सांगण्यावरुन ही रक्कम खासगी व्यक्ती तानाजी मारणे याच्याकडे दिली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने मारणेला लाच घेताना पकडले. चौकशीत बडदे यांच्या सांगण्यावरुन लाच घेतल्याचे उघड झाल्यानंतर दोघांवर रात्री उशीरा बंडगार्डन पोलिसांत गुन्हा दाखल करुन त्यांना ताब्यात घेतले. पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पोलीस निरीक्षक अमोल भोसले तपास करत आहेत.

# पुणे महापालिका पाण्याच्या टाक्या काढणार धुवून

पुणे – शहरात दूषित पाण्यामुळे गुलियन बॅरी सिंड्रोमचे (जीबीएस) हा आजार होत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून आता शहरातील लहान मोठ्या सर्व सुमारे साडे तीनशे पाण्याच्या टाक्या पुढील महिन्याभरात धुवून काढणार आहेत. यामुळे शहरातील पाणी पुरवठा विस्कळित होण्याची शक्यता आहे.




पुणे शहरात धायरी, नांदोशी, किरकटवाडी, नऱ्हे, सणसवाडी आदी भागात महापालिकेतर्फे शुद्ध केलेले पाणी पुरविले जात नाही. त्यामुळे या पाण्यातून इ कोलाय हा जीबीएस होण्यास कारणीभूत ठरणारा जिवाणू आढळल्याने खळबळ उडाली आहे. गेल्या महिन्याभरापासून महापालिकेने या भागातील जीबीएसचे रुग्ण रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत. विहिरीवरूण होणाऱ्या पाण्यामध्ये क्लोरिन मिश्रित केले जात आहे, शिवाय विहिरीला जाळी बसवून त्यात घाण पडणार नाही याची काळजी घेतली आहे. टँकरसाठी पाणी उपलब्ध करून देणाऱ्या विहिरी, आरओ प्रकल्प यांच्या पाण्यात जीबीएससाठी कारणीभूत असणारा जिवाणू आढळल्यानंतर त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे.

दूषित पाण्यामुळेच जीबीएस होत असल्याचे राष्ट्रीय विषाणू प्रयोगशाळेने (एनआयव्ही) यापूर्वीच स्पष्ट केले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाने आता प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून टाक्यांची स्वच्छता करण्याचा निर्णय घेतला आहे. रोजचा पाणी पुरवठा करताना महापालिकेला टाक्या स्वच्छ करताना अडचणी निर्माण होतात, तसेच पाणी पुरवठा विस्कळित होऊन नागरिकांच्या तक्रारी येतात. त्यामुळे आता विशेष मोहीम घेऊन टाक्या स्वच्छ केल्या जाणार आहेत. यासाठी एका महिन्याचा कालावधी लागण्याची शक्यता आहे. रोज वेगवेगळ्या भागातील टाक्या स्वच्छ केल्या जाणार आहेत.

# मोक्कातील गुन्हेगाराकडून जबरी चोऱ्या; पुणे पोलिसांनी ठोकल्या बेड्या

पुणे : राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. यामुळे नागरिकांसोबतचं पोलीसही हेराण झाले आहेत. अशातचं आता पुण्यातून एक मोठी बातमी समोर आली आहे. मोक्का कायद्यानुसार येरवडा कारागृहात असलेल्या गुन्हेगाराची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्याने पुन्हा जबरी चोर्या केल्याचे समोर आले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट दोनने त्याला पकडून त्याच्याकडून २ गुन्हे उघडकीस आणले आहेत. त्याच्याकडून ९३ हजार रुपयांचे ४ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.



मोहरम अली शफी शेख (वय ३२, रा. संजय गांधी मार्ग झोपडपट्टी, मालधक्का चौक, बंडगार्डन) असे या गुन्हेगाराचे नाव आहे. ही कामगिरी पोलीस निरीक्षक प्रताप मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली अमोल सरडे, उज्वल मोकाशी, निखिल जाधव, साधना ताम्हाणे, पुष्पेंद्र चव्हाण यांच्या पथकाने केली आहे.

मोहरम शेख हा रेकॉर्डवरील गुन्हेगार आहे. त्याच्यावर बंडगार्डन पोलीस ठाण्यात २०२१ मध्ये दरोड्याचा गुन्हा दाखल होता. तसेच इतर ६ चोरीचे गुन्हे दाखल आहेत. गुन्हे शाखेचे युनिट दोनचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे बंडगार्डन परिसरात गस्त घालत होते. त्यावेळी पोलीस अंमलदार ओमकार कुंभार व हनुमंत कांबळे यांना मोहरम शेखबाबत बातमी मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मोहरम शेख याला पकडले. त्याच्याकडून ४ मोबाईल जप्त करण्यात आले आहेत.

# महिलांसाठी नवा सुरक्षा फॉर्म्युला; पुणे पोलिसांचे 'महिला बीट मार्शल' देणार मदतीचा हात

पुणे । प्रतिनिधी

पुणे शहर पोलिसांनी कॉप २४ हा उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले असून, त्यांचा ड्रेस कोड, त्यांची वाहने आणि त्यांना प्रशिक्षण देण्यात आल्यानंतर आता महिलांना अडचणीच्या काळात मदतीचा हात देण्यासाठी 'महिला बीट मार्शल' पोहचविण्याचा प्रयत्न पुणे पोलिसांनी सुरू केला आहे. तरुणी किंवा महिलेने अडचणीच्या काळात मदतीसाठी ११२ ला कॉल केल्यानंतर घटनास्थळी महिला बीट मार्शल पाठविण्याचे नियोजन केले आहे.



व्हिजीबल पोलिसींगच्या धर्तीवर तसेच पुणेकरांच्या तात्काळ मदतीसाठी आणि सुरक्षित भावना निर्माण करण्यासाठी पुणे पोलिसांनी 'कॉप-२४' हा उपक्रम सुरू केला आहे. कॉप-२४ च्या माध्यमातून २४ तास बीट मार्शल शहरात पेट्रोलिंग करणार आहेत. पुणे पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांच्या महत्वाकांक्षी उपक्रमात ७२६ कर्मचाऱ्यांची नेमणूक केली आहे. त्यात ५२६ पुरूष व २०० महिला कर्मचारी आहेत. या कॉप्संना वेगळा ड्रेस कोडही केला गेला आहे. त्यांना १२३ दुचाकी वाहने तसेच ३९ सीआर मोबाईल व्हॅन (कार) देण्यात आल्या आहेत.

पोलिसांच्या हेल्पलाइनवर प्राप्त होणाऱ्या महिलांच्या तक्रार निवारणासाठी घटनास्थळी महिला बीट मार्शलची रवानगी करण्याचा निर्णय वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घेतला आहे. त्यामुळे तक्रारदार महिलांना खुलेपणाने त्यांचे म्हणणे मांडता येणार आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घघाटन**

पोलिसांच्या कॉप २४ या उपक्रमाचे येत्या १५ फेब्रुवारीला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. पोलीस मुख्यालयात पुणे पोलिसांचा 'तरंग' हा कार्यक्रम आयोजित केला असून, त्याठिकाणी मुख्यमंत्र्याकडून वेगवेगळ्या उपक्रमांना झेंडा दाखवून उद्घटान होणार आहे.

**वाहनांना जीपीएस**

'कॉप २४' या उपक्रमाअंतर्गत शहरात १२३ दुचाकी आणि ३९ कारचा वापर केला जाणार आहे. या सर्व वाहनांना 'जीपीएस' लावण्यात आले आहेत. त्याद्वारे बीट मार्शलवर नियंत्रण ठेवले जाणार आहे. यामुळे बीट मार्शलकडून कामात हलगर्जी केली जाणार नाही, अशी शक्यता वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

**'बॉडी कॅमेरा'**

सर्व बीट मार्शलच्या वर्दीवर बॉडी कॅमेरा लावण्यात येणार आहे. त्यामुळे एखाद्या वर्दीच्या ठिकाणी बीट मार्शल दाखल झाल्यानंतर तेथे घडणाऱ्या गोष्टींचे रेकॉर्डिंग होणार आहे. त्यामुळे पोलिसांवर कोणी आरोप करू शकणार नाही किंवा एखादा कर्मचारी चुकीच्या पद्धतीने वागल्यास त्याचीही माहिती त्या रेकॉर्डिंगमधून कळू शकते.

'कॉप-२४'च्या माध्यमातून पोलिस शहरात गस्त घालणार असून, घटनास्थळी तत्काळ दाखल होणार आहेत. या बीट मार्शलसाठी निळ्या रंगाची वर्दी निश्चित करण्यात आली आहे.